लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps



पान 3 / जळगाव बिनविरोध उमेदवार...

जळगाव, शनिवार, दि.३ जानेवारी २०२६ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -५७ •पाने ६ •किंमत ३ रु.

## सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,३७,०००
- **चांदी** (प्रति १ किलो): २,४२,०००

## तापमान

- **कमाल** : २८ अंश सेल्सिअस
- **किमान** : ११ अंश सेल्सिअस

## सूर्योदय-सूर्यास्त

| दि.०३ | दि.०४ |
|---|---|
| सूर्योदय : ७.०९ वा. | सूर्योदय : ५.५५ वा. |
| सूर्यास्त : ७.१० वा. | सूर्यास्त : ५.५६ वा. |

## महत्वाचे

### पुलाखाली दुचाकी कोसळून पतीचा मृत्यू, मायलेकी गंभीर



**जळगाव :** नातेवाईकांच्या उत्तरकार्याचा विधी आटोपून घराकडे परतणाऱ्या कुटुंबावर काळाने भीषण घाला घातला आहे. जळगाव तालुक्यातील चिंचोली पुलाजवळ दुचाकीवरील ताबा सुटल्याने वाहन थेट पुलाखाली कोसळले. या भीषण अपघातात पतीचा जागीच मृत्यू झाला असून, पत्नी आणि मुलगी गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेमुळे जुन्या जळगाव परिसरातील कोल्हेवाडा भागात शोककळा पसरली आहे. किरण उर्फ राजू लक्ष्मण चव्हाण (वय ४०, रा. कोल्हेवाडा, जळगाव) असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. किरण हे गेल्या ३० वर्षांपासून शहरातील आठवले हॉस्पिटलमध्ये कार्यरत होते. गुरुवारी, १ जानेवारी रोजी जामनेर येथे एका नातेवाईकाचे निधन झाल्याने त्यांच्या उत्तरकार्यासाठी किरण चव्हाण हे पत्नी हर्षदा (वय ३५) आणि मुलगी अस्मि (वय १३) यांच्यासह दुचाकीने गेले होते. ताबा सुटला अन् दुचाकी कोसळली: जामनेर येथील कार्यक्रम आटोपून सायंकाळच्या सुमारास जळगावकडे परतत असताना, चिंचोली पुलाजवळ किरण यांचा दुचाकीवरील ताबा सुटला.

# मनपाच्या आखाड्यात भाजप- शिवसेनेचा विजयी षटकार

## १२ जागा बिनविरोध; महायुतीच्या गोटात आनंदाचे भरते : महाविकास आघाडीला मात्र धडकी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

महानगरपालिका निवडणुकीच्या माघारीच्या शेवटच्या दिवशी अनेकांचा मार्ग मोकळा झाल्याने महायुतीमध्ये आनंदाचे डोही आनंद तरंग असे वातावरण असून भाजपाचे सहा तर शिवसेनेचे सहा उमेदवार बिनविरोध झाल्याने महाविकास आघाडीला धडकी भरली आहे. आज माघारीच्या शेवटच्या दिवशी भाजपा आमदार तथा निवडणूक प्रमुख राजूमामा भोळे यांचे सुपुत्र विशाल भोळे हे विजयी झाले आहेत. शिवसेना आमदार चंद्रकांत सोनवणे यांचे सुपुत्र डॉ. गौरव सोनवणे हे देखील बिनविरोध विजयी झाले आहे. महानगरपलिकेच्या ७५ जागांपैकी बारा जागा बिनविरोध झाल्याने आता ६३ जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.



मनपाच्या आखाड्यात राजकारणाचा सामना रंगतदार झाला असून जळगाव महानगरपालिकेच्या निवडणूक रिंगणात भाजप- शिवसेनेने षटकार ठोकत महायुतीने सुरुवातीलाच आघाडी घेतली आहे. उमेदवारी माघारीच्या शेवटच्या दिवशी घडलेल्या राजकीय घडामोडींमुळे महायुतीच्या गोटात आनंदाचे भरते आले असून, दुसरीकडे महाविकास आघाडीच्या छावणीत मात्र चिंतेचे वातावरण पसरले आहे. निवडणुकीपूर्वीच बारा जागा बिनविरोध झाल्या आहेत.

जळगाव महानगरपालिकेच्या ७५ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असताना, माघारीच्या अखेरच्या दिवशी अनेक उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली. या राजकीय हालचालींचा सर्वाधिक फायदा महायुतीला झाला. शिवसेना, भाजपाचे तब्बल सहा उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. निवडणूक होण्याआधीच बारा जागांवर महायुतीचा झेंडा फडकला आहे. या बिनविरोध विजयांमध्ये राजकीय वजन असलेली नावेही आहेत. भाजपा आमदार तथा महानगरपालिका निवडणूक प्रमुख राजूमामा भोळे यांचे सुपुत्र विशाल भोळे हे बिनविरोध विजयी झाले. ही बाब भाजपासाठी प्रतिष्ठेची ठरली असून, पक्ष संघटनाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. त्याचबरोबर शिवसेना आमदार चंद्रकांत सोनवणे यांचे सुपुत्र डॉ. गौरव सोनवणे हेही बिनविरोध निवडून आल्याने शिवसेनेच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे. राजकीय घराण्यांचा प्रभाव आणि स्थानिक पातळीवरील पकड या दोन्ही गोष्टी या विजयांतून स्पष्टपणे समोर आल्या आहेत.



महायुतीच्या नेत्यांनी या घडामोडींना 'जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांचे संघटन' असे संबोधले आहे. शिवसेना आणि भाजपामधील समन्वयामुळे विरोधकांना अनेक प्रभागात धक्का दिला आहे. महाविकास आघाडीसमोर मात्र प्रश्नचिन्हे उभी राहिली आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि ठाकरे गट यांच्यातील जागावाटप आणि स्थानिक समन्वयाचा अभाव पुन्हा एकदा समोर आला आहे. अनेक प्रभागात ऐनवेळी उमेदवार माघारी गेल्याने महायुतीला बिनविरोध संधी मिळाली. यामुळे आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे.

### महायुतीचा आत्मविश्वास वाढला

महानगरपालिकेच्या एकूण ७५ जागांपैकी आता केवळ ६३ जागांसाठी मतदान होणार आहे. मात्र, बारा जागांवर आधीच निकाल लागल्याने निवडणुकीची गणिते बदलली आहेत. बहुमताचा आकडा गाठण्यासाठी महायुतीला आता तुलनेने कमी संघर्ष करावा लागणार आहे, तर महाविकास आघाडीला प्रत्येक जागा जीवापाड जिंकावी लागणार आहे. त्यामुळे उर्वरित प्रभागांतील प्रचार अधिक आक्रमक आणि धारदार होण्याची शक्यता आहे. बिनविरोध विजयांमुळे मतदारांवरही मानसिक प्रभाव पडतो. 'जिंकणाऱ्यांच्या बाजूनेच वारा वाहतो' ही मानसिकता स्थानिक निवडणुकांत निर्णायक ठरते. महायुतीने सुरुवातीलाच आघाडी घेतल्याने उर्वरित लढतींमध्ये त्यांचा आत्मविश्वास वाढलेला आहे.

### अशा आहेत बिनविरोध जागा

**भाजप**
- उज्वला बेंडाळे - प्रभाग १२ (ब)
- विशाल भोळे - प्रभाग ७ (क)
- दीपमाला काळे - प्रभाग ७ (अ)
- डॉ. विश्वनाथ खडके - प्रभाग १६ (अ)
- वैशाली पाटील - प्रभाग १३ (क)
- अंकिता पाटील - प्रभाग - ७ (ब)

**शिवसेना**
- डॉ. गौरव सोनवणे - प्रभाग १८ (अ)
- मनोज चौधरी - प्रभाग ९ (अ)
- रेखा पाटील - प्रभाग १९ (अ)
- प्रतिभा देशमुख - प्रभाग ९ (ब)
- सागर सोनवणे - प्रभाग २ (अ)
- गणेश उर्फ विक्रम सोनवणे - प्रभाग १९ (ब)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोठे वक्तव्य

# मुंबईचा महापौर हिंदू आणि मराठीच होईल!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

मुंबईसह २९ महापालिकांची निवडणूक जवळ आली आहे. या निवडणुकांमध्ये नेमकं काय होणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. मुंबई महापालिकेसाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी युती केली आहे. तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची साथही त्यांना आहे. तर दुसरीकडे शिवसेना एकनाथ शिंदे आणि भाजपाची युती आहे. अजित पवारांची राष्ट्रवादी वेगळी लढते आहे. तर काँग्रेस आणि



वंचित बहुजन आघाडीने एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. प्रचारसभा सुरु होतील, दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईचा महापौर मराठीच होईल असं म्हटलं आहे.
मराठी व्होटबँक दुसऱ्यांची आहे भाजपाची नाही हे समजूच नका. मराठी व्होटबँक आमची आहे हे लक्षात ठेवा. जर मराठी माणसांनी भाजपाला मतं दिली नसती तर सलग तीन निवडणुकांमध्ये आमचे उमेदवार आले नसते. कुणी काहीही दावा केला तरीही भाजपाच क्रमांक १ चा पक्ष आहे. मराठी, अमराठी सगळेच आमचे मतदार आहेत. मुंबईचं मराठीपण कुणीहीही घालवू शकत नाही. कुणीही कुठूनही आलं तरीही मराठीपण कायम राहणार आहे.
मुंबईत पूर्वी बाहेरुन मजूर यायचे, आता या शहरात वेगवेगळे लोक येतात. पण मुंबईचं मुंबई पण कुणीही पान २ वर »

# निवडणुकीच्या पाश्वभूमीवर प्रक्रियेला सुरुवात!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जळगाव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५- २६ चा कार्यक्रम घोषित करण्यात आलेला असून त्यानुसार निवडणुकीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दिनांक १५ जानेवारी रोजी मतदान व दिनांक १६ रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक प्रक्रिया करताना राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी निवडणुकीचे विविध टप्पे निश्चित केलेले आहेत. निवडणुकीचे टप्पेनिहाय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पुरेसा पोलीस बंदोबस्त असणार असून पोलीस अधिकारी, सशस्त्र पोलीस कर्मचारी यांच्या बंदोबस्तात प्रक्रिया करण्यात येणार आहे. जळगाव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याचे माननीय राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत सदर निवडणुकीत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ६ निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडणुकीचे दरम्यान पारदर्शकता म्हणून विविध टप्पेनिहाय प्रक्रिया पूर्ण करते वेळी, पान २ वर »










# यश मिळाल्याने दहाच दिवसात अपप्रवृत्ती पुन्हा बळावली

**आमदार अनिल पाटील यांचा पत्रकार परिषदेत आरोप**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

गेल्या ६ वर्षांपासून मी आमदार असताना माजी आमदारांचे अपप्रकार बंद केले होते परंतु आता नगरपालिका निवडणुकीत यश मिळाल्याने निकालानंतर फक्त दहाच दिवसात अपप्रवृत्तीने पुन्हा तोंड वर काढले असल्याचा आरोप आमदार अनिल पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी पत्रकारांना संबोधित करताना पुढे ते म्हणाले की शिवसेनेचे डॉ. बाविस्कर नगराध्यक्षपदी निवडले पण ते त्यांचे क्रेडिट मुळीच नाही. आणि संख्याबळ पाहता आमचे एक दोन का असेना नगरसेवक जास्त निवडलेत तरीही आम्ही पराभव स्वीकारला आणि विरोधात बसण्याची भूमिका घेतली आणि त्यांना



शुभेच्छा देखील दिल्या. परंतु पद्ग्रहण प्रसंगी यांनी ज्या पद्धतीने बेताल वक्तव्य केले ते कोण सहन करणार. संत सखाराम महाराज व पु सानेगुरुजी यांच्या भूमीत महिलांचा असा अपमान सहन केला जाऊ शकत नाही. तेथे काहींनी टाळ्या वाजवल्या याचाही आम्हाला खेद वाटतो. म्हणजे ज्या महिला राजकारणात अथवा नोकरीला किंवा उद्योगात असतात त्या महिला नवऱ्याच्या ताब्यात राहत नाहीत का. माझी पत्नी गेल्या अनेक वर्षांपासून येथील जनतेची सेवा करीत असून हे कार्य ती सतत करत राहील.

मी काय विकास केला यावर ते बोलतात पण ५ वर्ष ते फिरलेच नाही त्यामुळे झालेला विकास दिसणार नाही. चौधरी हे पुढील काळात शहरातील ज्या ज्या भागात स्वतःच्या गाडीत बसून जातील तो रस्ता मीच केलेला त्यांना दिसेल. असा कोणता विकास नाही झाला ते त्यांनी सांगावे. यासाठी माझे खुले आव्हान आहे की समोरासमोर या. या वक्तव्यातून महिला सक्षमीकरणला रोखण्याचा त्यांचा प्रयत्न दिसत असून या अपप्रवृत्ती आमचा विरोध आहे. आमदार म्हणून माझ्या आई बहिणींचा सन्मान ठेवणे माझी जवाबदारी आहे. ती मी पार पाडणारच आहे. पण अमळनेर कर जनतेला हेच बघायचे होते का? असा सवाल करत महिलांचा असन्मान सहन केला जाणार नाही असे त्यांनी शेवटी सांगितले.

# अंजनविहीरे येथे संत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्त ग्राम स्वच्छता अभियान

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भातखंडे** प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या कर्मवीर तात्यासाहेब हरी रावजी पाटील किसान शिक्षण संस्था भडगाव संचलित माध्यमिक विद्यालय अंजनविहीरे येथे नुकत्याच झालेल्या संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गावात ग्रामस्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानात इ. ०५ वी ते इ.१० वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला व उत्तमरीत्या गावाची स्वच्छता केली. या अभियानात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एका अज्ञात देणगीदाराने दिलेल्या देणगीनुसार प्रोत्साहन पर व आकर्षक बक्षीस, विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.एन.पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. या अभियानातील बक्षीस पात्र विद्यार्थी



खालील प्रमाणे : छोटा गट( मुली) – प्रथम क्रमांक. – १)प्राजक्ता किरण पाटील (इ.०६वी) द्वितीय क्रमांक – २) सोनल कुशल पाटील (इ.०७वी) तृतीय क्रमांक – ३) हेमांगी संजय पाटील (इ.०५वी). मोठा गट ( मुली) प्रथम क्रमांक. १) तन्वी गजानन पाटील (इ.०८वी) द्वितीय क्रमांक २) तेजस्विनी विलास पाटील (इ१०वी तृतीय क्रमांक ३) योगेश्री जगदीश पाटील (इ.०९वी). छोटा गट ( मुले) प्रथम क्रमांक १) मानव संजय पाटील (इ.०५वी) द्वितीय क्रमांक २) यश सिद्धार्थ जावरे (इ.०६वी) तृतीय क्रमांक ३) राज ज्ञानेश्वर पाटील (इ.०७वी). मोठा गट ( मुले) : प्रथम क्रमांक १) हर्षल अनिल बोरसे (इ.०९वी) द्वितीय क्रमांक २) यश विजय पाटील (इ.०८वी) तृतीय क्रमांक ३) दुर्गेश संभाजी पाटील (इ.१०वी) स्वच्छता अभियान यशस्वीतेसाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक ए एन सोनवणे, एच.पी. सोनवणे, आर यू राऊळ, ए पी मनोरे, पी आर भोसले, वाय डी पाटील टी आर बोरसे, पी वाय पवार, आर डी वाघ, महेश पाटील, भाऊसाहेब पाटील, अमोल पाटील यांनी परिश्रम घेतले.

# सेवेचा वसा घेऊन सोनल देवतळे रिंगणात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चंद्रपूर** प्रतिनिधी

चंद्रपूर महानगरपालिका निवडणूक २०२५, २६ साठी प्रभाग क्रमांक ८ (अ) मधून सौ. सोनल प्रकाश देवतळे यांनी आपली उमेदवारी जाहीर केली आहे. त्या भारतीय जनता पार्टी कडून निवडणूक लढवत असून त्यांचे निवडणूक चिन्ह कमळ आहे. त्या ओबीसी महिला प्रवर्गातील उमेदवार आहेत. सामान्य कुटुंबातून आलेल्या सोनल प्रकाश देवतळे यांनी आई, सून आणि लेक या भूमिका निभावताना जनतेच्या रोजच्या अडचणी अगदी जवळून पाहिल्या आहेत. घर, संसार आणि समाज यांचा अनुभव घेत त्यांनी जनतेसाठी काहीतरी करण्याचा निर्णय घेतला आणि सेवेचा वसा स्वीकारत जनसेविका म्हणून त्या मैदानात उतरल्या आहेत. त्यांचे पती प्रकाश देवतळे हे पक्षाचे नेते असून



आहे. बी.एससी., डी.एड या शैक्षणिक पात्रतेच्या जोरावर शिक्षण सुधारणा, महिलांचे सबलीकरण आणि युवकांच्या विकासासाठी काम करण्याचा त्यांचा ठाम निर्धार आहे. त्यांनी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सुमारे २५ वर्षे प्रामाणिकपणे काम केले आहे. "सत्ता नको, सेवा महत्त्वाची" हा विचार त्यांच्या कार्यातून दिसून येतो आणि तोच विचार सोनल देवतळे यांच्या सार्वजनिक जीवनाचा पाया ठरला प्रभागाचा सर्वांगीण आणि पारदर्शक विकास करणे हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, प्रभागातील मतदारांनी मतदान करून सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन जनसेविका सौ. सोनल प्रकाश देवतळे यांनी केले आहे.

## पान १ वरून

पान १ वरून

### मुंबईचा महापौर...

घालवू शकत नाही. मुंबईच्या गणेशोत्सवात पारंपरिक मराठी पद्धतीनेच उत्सव साजरा होतो. त्यामुळे मुंबईची संस्कृती ही टिकवायची आहेच. मुंबईची संस्कृती आणि तिची वाटचाल इकडे तिकडे जाऊ देणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईचा महापौर महायुतीचा होईल, मुंबईचा महापौर हिंदू होईल आणि मुंबईचा महापौर मराठीच होईल, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबई तकला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी हे वक्तव्य केलं आहे. "मी १०० टक्के ठाकरे बंधूंच्या युतीचं क्रेडिट घ्यायला तयार आहे. बाळासाहेबांची मनापासून इच्छा होती पण ते करु शकले नाहीत. ते मी जर करु शकलो तर मराठी माणसाला एकत्रित आणायचं काम मी केलं आहे. पण आता या युतीला खूप उशीर झाला आहे. दोघांची मतं संपल्यावर हे दोघं एकत्र आले आहेत.

### निवडणुकीच्या...

मतदान यंत्रे ठेवण्यात आलेले स्ट्रॉंग रूम समक्ष उघडणे व स्ट्रॉंग रूम समक्ष बंद करण्याचे वेळी उमेदवारांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे. तरी वरील प्रक्रिया करताना नमूद केलेल्या दिवशी वेळी व दिलेल्या ठिकाणी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी ठिकाण :– महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (विस्तारित) क्षेत्रातील प्लॉट नंबर एच –१४ महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ परिसरातील गोडाऊन क्रमांक १४ व १७ जळगाव येथे उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी ज्ञानेश्वर ढेरे यांनी केले आहे.

**CHAING IN NAME**

My old name is **DAYMA KRUSHNA PRAMOD** But I have changed my name My new name is **KRISHNA PRAMOD DAYMA**

**CHAING OF NAME**

MY OLD NAME **JYOTI PREM JOSHI,** IS NOW PERMANENTLY CHANGE AS **JYOTI SANJAY DORKAR,** PLEASE NOTE IT.

**SIGNATURE**
**JYOTI SANJAY DORKAR**
**RESIDING- JALGAON**

**CHAING OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM **SAMIR KHAN FIROZ KHAN (OLD NAME). TO SAMEER KHAN FIROZ KHAN BHISTI (NEW NAME).** ALL DOCUMENTS ARE BELONG TO MY NAME.

## निधन वार्ता

### अरविंद कुलकर्णी



**जळगाव –** स्व.अरविंद रघुनाथ कुलकर्णी माजी कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद जळगाव (वय ८१), रा. बळीराम पेठ, जळगाव यांचे आज दिनांक ०२/०१/२०२६ रोजी दुपारी १.४५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्य:यात्रा दिनांक ०३/०१/२०२६ रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरातून नेरीनाका येथे निघणार आहे. ते केदार कुलकर्णी यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, २ भाऊ, ४ मुली व १ मुलगा सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### अनुसयाबाई बोराखडे : आज अंत्य:यात्रा



**मनवेल ता. यावल –** साकळी येथील पाटील वाडा भागातील रहिवासी गं. भा. अनुसयाबाई चुडामन बोराखेडे (वय– ८५) यांचे दि. २ वार शुक्रवार रोजी दुपारी १२ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा दि. ३ वार शनिवार रोजी सकाळी १० वाजता राहते घरून निघणार आहे. त्या साकळी नूतन विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन आत्माराम बोराखडे तसेच यशवंत, केशव बोराखडे यांच्या मातोश्री होत.


**महानिर्मिती** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३००००६४०९६ | प्रॉक्यूरमेंट ऑफ १५०एनबी डीव्ही–२ डोम वॉल्व स्पेयर पार्ट्स फॉर ड्राय फ्लाय अॅश कन्वेईंग सिस्टिम अॅट एएचपी यू–८, टीपीएस, परळी वै. | ४.१० लाख ७६०८/ | ०३.०१.२०२६ ते १०.०१.२०२६ | ११.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४३६८ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ मेजरिंग इन्स्ट्रुमेंट फॉर डे टु डे मेंटेनेंस अॅक्टीव्हिटीज अॅंड ड्यूरिंग एओएच अॅट ईटी यू ८,२५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | २.९८ लाख ६४८३/ | ०३.०१.२०२६ ते १८.०१.२०२६ | १९.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४३९ (आर) | वर्क ऑफ रिप्लेसमेंट ऑफ बाउल अॅंड बाउल हब असेम्बली ऑफ कोल मिल एक्सआरपी–९०३ अॅट बीएम–२, यू–८, टीपीएस, परळी वै. | ३३.९० लाख ३७४०८/– | ०३.०१.२०२६ ते १८.०१.२०२६ | १९.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४५१६ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ सोडियम सिलिकेट फॉर लिकेजेस अॅंड कपलिंग फॉर टू बॉडीड अॅंड फोर बॉडीड पम्प अॅंड कंज्यूमेबल फॉर कोल मिल यू–६अॅंड ७ अॅट बीएम–१,२५०मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | २.६० लाख ६१०९/– | ०३.०१.२०२६ ते १८.०१.२०२६ | १९.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४५४८ (आर) | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर रीपेयर ऑफ अॅडमीन बिल्डिंग लिफ्ट इंस्टॉलड अॅट अॅडमीन बिल्डिंग ईएम–२ , २५० मे. वॅट , टीपीएस, परळी वै. | ६.१० लाख ९६००/– | ०३.०१.२०२६ ते १३.०१.२०२६ | १४.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६२१०९ | वर्क ऑफ प्रोव्हायडिंग सर्विसेस फॉर क्लिनिंग ऑफ केबल गॅलरीज, केबल ट्रेज बाय स्किलड ऑपरेटर्स विथ इंडस्ट्रियल वैक्युम क्लिनिंग मशीन ऑन अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड बेसिस अॅट सीएचपी–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १२.२१ लाख १५७१२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६३७०४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ पीए अॅंड एफडी फॅन लुब ऑइल सिस्टिम स्पेयर्स फॉर यू–६अॅंड ७ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ५.०४ लाख ८५४३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६३७३५ | द वर्क ऑफ रिमोव्हिंग ग्रास , श्रब्स अॅंड ट्रीमिंग ऑफ त्री ब्रांचेस अॅट एनपीटीपीएस यू–८, प्रीमायसेस परळी वै. | २२.७० लाख २६२०७/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६३७५३ | प्रॉक्यूरमेंट ऑफ रीडयूसर गियर बॉक्स लुब ऑइल पम्प फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १०.५५ लाख १४०५२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६३९५७ | अॅन्युअल मेंटेनेंस वर्क कॉंट्रॅक्ट फॉर द वर्क डे–टू–डे मेंटेनेंस ऑफ ड्रिंकिंग वॉटर सप्लाय सिस्टिम अॅंड असोसियटेड वर्क्स इन डीईएफ, एबीसी,अॅंड न्यू कॉलनी अॅट टीपीएस, परळी वै. | ११.८९ लाख १५३९८/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४०५८ | टेक्निकल सर्विसेस ऑफ सर्विसिंग ऑफ २२०व्ही डीसी क्लोराइड मेक (फोर्मेली कॅल्डाइन) बॅटरी चार्जर्स ऑफ ईटी, यू––८, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १.८० लाख ५३०५/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४१६१ | एडब्ल्यूसी फॉर कंप्लीट रिवायडिंग ऑफ एल.टी. मोटर्स ऑफ रेटिंग अबाउ ५० केडब्ल्यू अप टू १६० केडब्ल्यू इंस्टॉलड अॅट ईएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.३३ लाख ८८३२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४२५८ | वर्क ऑफ रिप्लेसमेंट ऑफ प्लॅनेटरी गियर बॉक्स केएमपी–२८०/३०० ऑफ कोल मिल एक्सआरपी–९०३ अॅट बीएम यू–८, टीपीएस, परळी वै. | २३.४७ लाख २६९७७/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४२६० | टू इयरली अॅन्युअल कॉंट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस , हाऊस कीपिंग अॅंड मेंटेनेंस ऑफ व्हीआयपी रेस्ट हाऊस अॅट टीपीएस, परळी वै. | ३४.६५ लाख ३८१५३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४३१२ | एएमसी फॉर अटेंडिंग कंप्लइंट्स ऑफ ऑल टाइप्स ऑफ डोर्स , विंडोज अॅंड कार्पेटरी रिलेटेड वर्क्स अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड इन एनपीटीपीएस यू–८ अॅट परळी वै. | ९.२३ लाख १२७३२/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४३३१ | एडब्ल्यूसी फॉर अटेंडिंग कम्पलेंट्स ऑफ सॅनिटरी वर्क इंक्लुडिंग रिमोविंग चोक अप ऑफ टॉयलेट ब्लॉकस , सेवर लाइन्स अॅंड मॉडीफिकेशन ऑफ सॅनिटरी ड्रेन लाइन्स अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड इन यू–८, सिविल, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.९० लाख १३४०१/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४३३३ | अॅन्युअल कॉंट्रॅक्ट फॉर मिसस्लेनियस सिविल वर्क्स रीक्वायर्ड फॉर अटेंडिंग कम्पलेंट्स अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड अॅट न्यू पॉवर हाऊस यू–८, परळी वै. | १९.९९ लाख २३४९३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४३६५ | एएमसी फॉर कोल मिल डीपी मेंटेनेंस अॅट आय अॅंड सी–२,२५०मे.वॅट टीपीएस,परळी वै. | १.०८ लाख ३२५३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४४२ | एएमसी फॉर सर्विसिंग ऑफ मोटराईजड वॉल्व अॅच्युयटर्स अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी –१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३.८१ लाख ७३२०/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४६३ | एएमसी फॉर द वर्क ऑफ प्रोव्हायडिंग सर्विसेस फॉर हायड्रा क्रेन, ट्रॅक्टर ट्रोली अॅंड जेसीबी/ पोकलेन मशीन अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड बेसिस अॅट बीएम–२,टीपीएस,परळी वै. | ९.३२ लाख १२८२९/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४७७ | प्रॉक्यूरमेंट ऑफ सील एयर फॅन इंप्लेयर, क्लॉकवाइज अॅंड अॅंटीक्लॉकवाइज फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १४.४० लाख १७९००/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४९७ | एएमसी फॉर सर्विसिंग ऑफ मोटराईजड वॉल्व अॅच्युयटर्स अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी –२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४.१५ लाख ७६५३/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४५१३ | टू इयर एएमसी फॉर रेल ट्रॅक मेंटेनेंस ऑफ रेल्वे साइडिंग अॅट सीएचपी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २७.५९ लाख ३१०९६/ | ०३.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ | २५.०१.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**



**जाहिर नोटीस** **अॅड.एस.एम.साठे,के.पी.बारी**

**जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामनेर जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं. २१३/२०२५**
**निशाणी ७**
**चौकशी तारीख ०३/०१/२०२६**

**अर्जदार :-** १] विमलबाई भास्कर सपाटे, उ.व.५९,धंदा घरकाम [२] वैशाली अमोल सपाटे, उ.व. २३,धंदा घरकाम [३] आराध्या अमोल सपाटे, उ.व. ७ धंदा शिक्षण [४] अक्षरा अमोल सपाटे, उ.व.५ धंदा शिक्षण [५] शिवांश अमोल सपाटे, उ.व. १,धंदा काही नाही, सर्व रा.पळासखेडे बु. ता. जामनेर जि. जळगाव, अर्जदार नं. २ स्वत: करीता व अर्जदार नं. ३ ते ५ ची अ.पा.क. म्हणून जनक आई

**//विरुध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट कलम २ व ३ प्रमाणे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकरीता अर्ज**

या कामी अर्जदारातर्फे मे. कोर्टात अर्ज असा की,१] असे की, अर्जदार हे वर नमुद पत्यावरील रहिवाशी असून आजही ते वर नमुद पत्यावर राहतात. तसेच अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा **मयत अमोल भास्कर सपाटे यांचे वारस आहे असा वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. अमोल भास्कर सपाटे हे ता. २६/०९/२०२५ रोजी पळासखेडा बु. ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत** झालेले असून अर्जदार नं. १ ही **मयत अमोल भास्कर सपाटे यांची आई आहे.** अर्जदार नं. २ ही **मयत अमोल भास्कर सपाटे यांची पत्नी असून अर्जदार नं. ३ ते ५ हे मयत अमोल भास्कर सपाटे** यांचे मुले व मुली आहे. या अर्जदारांशिवाय **मयत अमोल भास्कर सपाटे** यांना दुसरे कुणीही वारस नाहीत.[२]असे की,**मयत अमोल भास्कर सपाटे यांचे नावावर MAHINDRA & MAHINDRA LIMITED या कंपनीचे ट्रॅक्टर त्याचे वर्णन खालीलप्रमाणे - [अ] ट्रॅक्टरचे वर्णन खालीलप्रमाणे [अ] ट्रॅक्टरचे नाव - MAHINDRA & MAHINDRA LIMITED[ब]रंग - निळा [क] गाडीचे इंधन - डिझेल [ड] चेसीस नंबर - WYCD45922938946 [इ] इंजिन नंबर - 433009SWDO5668 [ई] मॉडेल नंबर - SWARAJ744FE [उ] रजि. तारीख - २०/०५/२०१६ [ ऊ] रजि. नंबर - MH19CJo450 या वर्णनाचे ट्रॅक्टर** हे आर टी ओ ऑफीस जळगांव येथे नोंदणीकृत झालेले आहे. सदरचे ट्रॅक्टर हे **मयत अमोल भास्कर सपाटे** यांच्या पश्चात कॉ.नं.अ] यांत वर्णन केलेल्यसा ट्रॅक्ध्र करीता मयताचे वर्ग १ मधील कायदेशीर वारस म्हणून सदर वाहनाच्या आर सी बुकावर अर्जदाराच्या नावाने नोंद व्हावी म्हणून अर्जदार यांनी आ टी ओ ऑफीस जळगांव यांचेकडे रितसर मोटर वाहन कायद्यानुसार अर्ज दिला असता संबंधीत अधिकारी यांनी सदर मोटारसायकल करीता अर्जदार हे **मयत अमोल भास्कर सपाटे** यांचे कायदेशीर वारस आहेत असा मे. सक्षम दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला असल्याशिवाय वारसांची नावे लावता येणार नाही असे दि. १३/११/२०२५ रोजी सांगितले म्हणून सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे. **मयत अमोल भास्कर सपाटे** यांचे अर्जदार नं. १ ते ५ हेच मयताचे पश्चात कॉ.नं.अ] यात नमुद केलेल्या वर्णनाच्या ट्रॅक्टर करीता कायदेशीर वारस आहे असा वारस दाखला [ Legal hairhsip Certificate ] अर्जदाराचे नावे देण्याचे आदेश व्हावा.[३]त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **मयत अमोल भास्कर सपाटे** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. ०३/०१/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. हया जाहिरानाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबद् दलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **०८/१२/२०२५** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

**सही/-** **कोर्टाचा शिक्का** **हुकूमावरुन**
**क. लिपीक** **सही/-**
**सहा.अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर जामनेर**



**जाहिर नोटीस**

**विषय :- वारस सत्य असल्याबाबत....**

कै. मोतिराम धनजी भोई यांचा दि. २३/०४/२०२० रोजी मृत्यु झाला असुन त्यांना कायदेशिर वारस म्हणून मुले-३/मुली-२/पत्नी-१ असे वारस आहेत.

| अ.नं. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती कस्तुराबाई मोतिराम भोई | ७९ | पत्नी |
| २ | श्री शांताराम मोतिराम भोई | ५३ | मुलगा |
| ३ | श्री किशोर मोतिराम भोई | ४१ | मुलगा |
| ४ | श्री शिवा मोतिराम भोई | ३५ | मुलगा |
| ५ | रेखबाई सुरेश भोई हरणे | ४७ | मुलगी |
| ६ | मुक्ताबाई कैलास भोई | ४६ | मुलगी |

येणे प्रमाणे त्यांच्या पश्चात कायदेशिर वारस कोणीही नाही. सदरच्या वारसांव्यतिरिक्त दुसरे इतर वारस नाहीत. कै. मोतिराम धनजी भोई यांचे नावे मौजे वरणगाव ता. भुसावळ येथील नगर परिषद घर नंबर नविन नं. १२०१ व जुना नं. ६१२८ असा आहे. या मिळकतीस वरील प्रमाणे वारस नगर परिषद वरणगांव दप्तरी येथे नोंद होणेबाबत नोटीस व्दारे प्रसिध्दी देण्यात आली आहे. या वारस नोंद होणे बाबत कोणाचीही काहीएक हरकत तक्रार असल्यास म. मुख्याधिकारी नगर परिषद वरणगाव यांचे दप्तरी लेखी स्वरुपात कळवावे.



**साने गुरुजी जिनिंग प्रेसिंग व कृषी प्रक्रिया सह.संस्था**
[अमळनेर-चोपडा-एरंडोल तालुका अमळनेर [जि.जळगांव]
**कार्यालय-**गाळा क्र.१६,संकुल नं.२,कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर [जि.जळगाव]

**चेअरमन - विजय न.पाटील**

**जा.क्र. -** **ता. / /२०२६**

सानेगुरुजी जिनिंग प्रेसिंग कृषि प्रक्रिया सह संस्था मर्या. अमळनेर या संस्थेची निवडणुकी साठी मतदारांची तात्पुरती यादी संस्थेच्या नोटीस बोर्डवर व सहाय्यक निबंधक सह. संस्था अमळनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. त्यावर हरकती व आक्षेप असतील तर दिनांक ७/१/२०२६ पर्यत सहाय्यक निबंधक सह संस्था अमळनेर येथे सादर करावेत हरकतीवर निर्णय देण्याची अंतिम दिनांक ९/१/२०२६ वार शुक्रवार असेल.

**सही/-**
**मॅनेजर**
**सानेगुरुजी जिनिंग प्रेसिंग कृषि प्रक्रिया सह संस्था ,अमळनेर जि.जळगांव**



**जाहिर नोटीस** **अॅड.एस.एम.साठे,के.पी.बारी**

**जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामनेर जि. जळगाव यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं. २२५/२०२५**
**निशाणी ७**
**चौकशी तारीख ०७/०१/२०२६**

**अर्जदार :-** १] चंद्रकला भिमराव शिंदे, उ. व. ६५ धंदा घरकाम [२] कमलबाई यशवंत शिंदे - मयत - [२अ] शोभाबाई यशवंत शिंदे, उ.व. ५८ धंदा घरकाम, लग्नानंतरचे नाव शोभाबाई जगन्नाथ मराठे [२ब] जयवंत यशवंद शिंदे, उ.व. ५५ धंदा मजूरी [२क] अमृत यशवंत शिंदे,उ.व.५२,धंदा मजूरी [२ड] सरला संजय मराठे, उ.व. ५१,धंदा घरकाम [२इ] अशोक यशवंत शिंदे मयत - [२इ१] छाया अशोक शिंदे, उ.व. ४६ धंदा घरकाम [२इ२] रुपाली सुनील भोईटे, उ.व. ३२ धंदा घरकाम रा. खेडी ता. जि. जळगाव [२इ३] मनिषा मुकेश मराठे, उ.व.४३ धंदा घरकाम [२इ४]राहुल अशोक शिंदे, उ.व. २७ धंदा मजूरी, नं. १ रा.हनुमान मंदीर चोघुले प्लॉट जळगाव ता. जि.जळगाव, नं. २क रा.शनीपेठ चौघुले प्लॉट जळगांव ता. जि. जळगांव, न२अ रा. अडावद ता. चोपडा जि. जळगाव , नं.२ड रा.गणेशवाडी जामनेर ता. जामनेर जि. जळगाव, नं.२इ१,२इ३,२इ४ रा.चौघुले प्लॉट जळगांव ता. जि. जळगांव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- भारतीय वारस कायदा कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता अर्ज**

या कामी अर्जदार क्र.१ ते २इ४ मे कोर्टात अर्ज असा की,१] असे की, अर्जदार हे वर नमुद पत्यावरील रहिवाशी असून आजही ते वर नमुद पत्यावर राहतात. तसेच अर्जदार नं. १ ते २इ४ यांनी सदरचा अर्ज हा **मयत भागाबाई राजाराम कासार [पवार]** यांचे वारस आहेत म्हणून तसा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. **मयत भागाबाई राजाराम कासार [पवार] हे ता. १५/०४/१९९५ रोजी हिवरखेडे बु. ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झाले आहे. मयत भागाबाई राजाराम कासार [पवार] यांचे** अर्जदार नं. १ व २ ही मुली असून नं. २ या **कमलबाई यशवंत शिंदे ता ३१/१२/२०२० रोजी जळगांव ता. जि. जळगांव येथे मयत झाले असून मयत कमलबाई यशवंत शिंदे** यांना ३ मुले व २ मुली आहेत. त्यापैकी **अशोक यशवंत शिंदे हे ता. २२/५/२०२२ रोजी जळगाव येथे मयत** झालेले असून त्यांचे वारस अर्जदार नं. २इ१ ते २इ४ हे आहेत. तसेच **मयत भागाबाई राजाराम कासार [पवार] यांच आई ही मयत झालेली आहे मयत भागाबाई राजाराम कासार [पवार] या हिवरखेडा बु. ता. जामनेर जि. जळगांव** येथील कायम रहिवासी होते व त्यांचे नावे **मौजे हिवरखेडे बु. येथील गट नं. १३५ पैकी प्लॉट नं. २५ त्याचा ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत ग्रा. पं.घर नं. ६७९ क्षेत्र ८४ चौ.मि.ची बखळ जागा आहे.** [२]असे की,**मयत भागाबाई राजाराम कासार [पवार] या हिवरखेडा बु. ता. जामनेर जि. जळगांव येथील कायम रहिवासी होते व त्यांचे नावे मौजे हिवरखेडे बु. येथील गट नं. १३५ पैकी प्लॉट नं. २५ त्यांचा ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत ग्रा.पं.घर नं.६७९ क्षेत्र ८४ चौ.मि.ची बखळ जागा असून अर्जदार हे ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेडे बु. येथे वारस** म्हणून सदर मिळकतीस नाव लावण्यासाठी गेले असता त्यांना ते मयताचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारस दाखला संबंधीत अधिकारी यांनी **ता. ०६/०७/२०२५ रोजी अर्जदारांना आणण्यास सांगितले** परंतु अर्जदार यांचेजवळ वारस दाखला नसल्याने वर नमुद मिळकतीस वारस लागू शकत नाही. म्हणून **मयत भागाबाई राजाराम कासार [पवार]** यांचे अर्जदार नं. १ ते २इ४ यांना कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला असे. [३]असे की,त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी **मयत भागाबाई राजाराम कासार [पवार]** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. ०७/०१/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. हया जाहिरानाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबद् दलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **०९/१२/२०२५** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

**सही/-** **कोर्टाचा शिक्का** **हुकूमावरुन**
**क. लिपीक** **सही/-**
**सहा.अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर जामनेर**

**लोकशाही**

**संपादकीय**

# जळगाव बिनविरोध उमेदवार निवडी मागचा अन्वयार्थ..!



महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी जळगाव मनपा मध्ये एकूण ७५ जागांपैकी १२ उमेदवार यांचे समोर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड होणार आहे. आता ७५ पैकी ६३ जागा जागांसाठी निवडणूक होणार आहे. बिनविरोध झालेल्या १२ उमेदवारांमध्ये सत्ताधारी महायुतीच्या भाजपाचे ६ तर शिवसेना शिंदे गटाचे ६ उमेदवारांचा समावेश आहे. १२ उमेदवारांपैकी भाजपच्या उमेदवार उज्वला बेंडाळे या प्रभाग क्रमांक १२ अ मधून तांत्रिकदृष्ट्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा अर्ज बाद झाल्यामुळे बिनविरोध निवडून आल्या. तथापि इतर ११ उमेदवार जे बिनविरोध निवडून येणार आहेत, त्या सर्व उमेदवारांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांनी अर्ज मागे घेतले की त्यांच्यावर दबाव आणून त्या प्रतिस्पर्धींचे अर्ज मागे घेण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणून ते मागे घ्यायला लावले? याचा अर्थ अर्ज मागे घेणाऱ्या उमेदवारांनी राजे खुशीने उमेदवारी अर्ज मागे घेतले की त्यांना अर्ज मागे घेण्यास भाग पाडले? हा संशोधनाचा विषय म्हणता येणार नाही. सर्वसामान्य नागरिकांना अथवा शेंबड्या पोरालाही जरी विचारले तरी त्याचे उत्तर काय काय मिळेल? याची सर्वांना कल्पना आहे. तथापि सत्तेपुढे शहाणपण चालत नाही असे म्हणतात. त्याचप्रमाणे माघार घेणाऱ्या उमेदवाराने 'माझ्यावर कसलाही दबाव आला नाही, परंतु मी निवडनुकीतून महाग माघार घेतली' असे माघार घेणारे सर्वच उमेदवार म्हणतील हेही नाकारता येणार नाही. माघार घेणारा कुठलाही उमेदवार 'माझ्यावर दबाव आला किंवा मला पैसे मिळाले म्हणून मी माघार घेत आहे', असे म्हणणारच नाही. कारण माघार घ्यायची होती तर निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल का केले? निवडणूक लढविण्याची या माघार घेणाऱ्या उमेदवारांकडून समाजसेवा करायची इच्छा होती की नव्हती? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. उमेदवारी अर्ज दाखल करायचे आणि आपले आर्थिक हित साध्य झाले की माघार घ्यायची, अशातला तर हा प्रकार नाही ना? या प्रश्नाचे उत्तर या माघार घेणाऱ्या उमेदवारांकडून मिळेल का? लोकशाहीमध्ये जर असा प्रकार होत असेल तर लोकशाही धोक्यात येणार नाही का? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

जळगाव मनपा निवडणुकीत जे १२ उमेदवार बिनविरोध निवडून येणार आहेत. ते सर्व महायुतीतील सत्ताधारी पक्षाचे आहेत, हे विशेष होय. विरोधी पक्षातील एकही उमेदवार बिनविरोध निवडून का आला नाही? याचे विश्लेषण होणे गरजेचे आहे. बिनविरोध निवड झालेले बारा उमेदवारांची समाजसेवा अथवा महापालिकेतील त्यांचे वर्चस्व असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली का? असे म्हणावे तर यामध्ये काही उमेदवार पहिल्यांदाच महापालिका निवडणूक लढवीत आहेत. डॉक्टर गौरव चंद्रकांत भोळे, विशाल भोळे, सागर शामकांत सोनवणे हे पहिल्यांदा महापालिका निवडणुकीत नगरसेवक पदासाठी उभे राहिले आणि ते बिनविरोध निवडून आले. याचा अर्थ त्यांना राजकीय वारसा होता म्हणून ते बिनविरोध निवडून आले असे म्हणावे का? मित्रहो महापालिका निवडणूक अथवा कुठलीही स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक अथवा आमदार खासदारकीची निवडणूक असो त्या निवडणुका सध्या कशा पद्धतीने होतात हे नव्याने जास्त सांगण्याची गरज नाही. विरोधी पक्षच संपवून टाकायचा ही सत्तेच्या राजकारणाची रणनीती असल्याचे स्पष्ट दिसून येते आणि तेच लोकशाहीला घातक आहे. यापूर्वी लोकसभा विधानसभेमध्ये अभ्यासू आणि जनतेची खऱ्या अर्थाने सेवा करणारे उमेदवार निवडून यायचे. आपल्या अभ्यासू पणाने सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडायचे. न्यायमूर्ती पै हे लोकसभेतील एक अभ्यासू नेते होते. त्यांचे विरोधात लोकसभेसाठीच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांकडून सुद्धा उमेदवार दिला जात नव्हता. ते बिनविरोध लोकसभेत निवडून यायचे. असे जागरूक अभ्यासू समाजाची सेवा करणाऱ्या उमेदवारांची बिनविरोध निवड झाली तर ते समाजासाठी आवश्यक होते. परंतु सत्तेच्या दबाव तंत्राने अथवा अर्थ प्रलोभनाने जर उमेदवाराची बिनविरोध निवड होणार असेल तर त्यात व्यक्तिगत स्वार्थ असतो हे विस्तृतपणे सांगण्याची गरज आहे, असे वाटत नाही. त्यासाठी प्रतिस्पर्धी माघार घेणारे उमेदवार सुद्धा तितकेच जबाबदार आहेत, हे मान्य करावे लागेल. त्यामुळे जळगाव महानगरपालिकेत या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांचे वर्चस्व राहील हे स्पष्ट जाणवते आहे.

# शिरीष चौधरींच्या वक्तव्याने महिलांचा उद्रेक

## माजी आमदारांच्या पत्नीबद्दल अपशब्द भोवले : पालिकेसमोर पुतळ्यास चपलांचा मार देऊन पुतळादहन

लोकशाही न्यूज नेटवर्क
अमळनेर प्रतिनिधी



माजी आमदार शिरीष चौधरीं यांनी नगराध्यक्ष पद्ग्रहण सोहळ्यात आमदार अनिल पाटील यांच्या पत्नीबद्दल चुकीचे वक्तव्य केल्याने अमळनेर शहरात काल महिला व कार्यकर्त्यांचा प्रचंड उद्रेक झाला. असंख्य महिला पुरुष व तरुणांच्या जमावाने हजारोंच्या संख्येने पालिकेसमोर एकत्र येत शिरीष चौधरींच्या पुतळ्यास चपलांचा मार देऊन पुतळादहन केले.

एवढेच नव्हे तर हा जमाव शिरीष चौधरीच्या स्टेशन रोडवरील निवासस्थानी देखील धडकला होता, याठिकाणी प्रचंड घोषणाबाजी झाल्याने सदर प्रकारामुळे अमळनेर शहर व तालुक्याची शांतता भंग होण्याची स्थिती निर्माण झाली होती. सुदैवाने पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने काही विपरीत घडले नाही. परंतु यावेळी काहींनी चौधरी यांच्या घराच्या दिशेने बांगड्या फेकत निषेध व्यक्त केला.

अमळनेर पालिकेचे नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्या पद्ग्रहण प्रसंगी माजी आमदार चौधरी यांनी आमदार अनिल पाटील यांच्या पत्नीबद्दल चुकीचे वक्तव्य केले होते, हे भाषण फेसबुकवर लाईव्ह असल्याने भाषणाच्या क्लिप शहर व तालुक्यात व्हायरल झाल्या होत्या. या भाषणामुळे व शहर व ग्रामिण भागातील कार्यकर्ते व महिला भगिनींमध्ये संतापाची भावना निर्माण झाली. सुरवातीला सोशल मीडियावर या वक्तव्याचा जोरदार निषेध सुरू झाला. त्यानंतर मात्र दुपारी ३ वाजेनंतर शहर व ग्रामिण भागातील हजारोचा जमाव पालिकेसमोरे एकत्र आला सर्वांनी निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. महिलांनी मनोगत व्यक्त करून महिलेच्या अपमानाबद्दल तीव्र निषेध व्यक्त करून चौधरी यांनी आमदारांच्या पत्नीची जाहीर माफी मागावी अशी मागणी केली. यानंतर महिलांनी चौधरी यांच्या पुतळ्यास बांगड्यांचा हार टाकून चप्पल व जोडे मार आंदोलन केले व नंतर पुतळा दहन करण्यात आला. त्यानंतर मोर्चा रुपात हा जमाव शिरीष चौधरी यांच्या कार्यालयासमोर धडकला. तेथे घोषणाबाजी केल्यावर महाराणा प्रताप चौकात घोषणाबाजी करून निषेध म्हणून टायर जाळण्यात आले. त्यानंतर हा जमाव आमदार अनिल पाटील यांच्या निवासस्थानी पोहोचून तेथेही घोषणाबाजी झाली. तेथे भाजपाचे ॲड व्ही आर पाटील, हिरालाल पाटील, भागवत पाटील, मनोज पाटील, प्रा मंदाकिनी भामरे यांनी मनोगत व्यक्त करून निषेध व्यक्त केला.

# पाल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन



लोकशाही न्यूज नेटवर्क
पाल प्रतिनिधी

सातपुडा विकास मंडळ, पाल संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाल येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष हिवाळी शिबिर दत्तक गाव गारखेडा (ता. रावेर) येथे उत्साहात सुरू झाले आहे. "शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व्यवस्थापन व पडित जमीन विकास" या विषयावर आधारित या शिबिराचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रा. महेश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कामिल तडवी पाल व कोमल बरके जि. प. शाळा, गारखेडा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक झांबरे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. पी. लभाणे यांचीही उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी स्वयंसेवकांना सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून कार्य करण्याचे मार्गदर्शन केले. या शिबिराअंतर्गत ग्रामस्वच्छता, जल व्यवस्थापन, वृक्ष लागवड, मतदार जनजागृती आदी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष एच. जहूरे यांनी शिबिराची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोनाली पवार हिने केले. सूत्रसंचालन नर्गिस तडवी तर आभार प्रदर्शन तरन्नुम तडवी हिने केले. यावेळी महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. नफिसा तडवी, प्रा. डॉ. अमोल पाटील, प्रा. चारुलता चौधरी, प्रा. ऊर्मिला बारेला, राजू नाथबाबा, सय्यद तडवी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सी.आर.पी.एफ. जवानाचा अकस्मात मृत्यू

लोकशाही न्यूज नेटवर्क
पाचोरा प्रतिनिधी



मुळचे खेडगाव (नंदिचे) ता. पाचोरा येथील सी. आर. पी. एफ. ४१ वर्षीय जवानाचा तळेगाव (पुणे) येथे कर्तव्यावर असतांना दुर्दैवी अकस्मात मृत्यू झाल्याची घटना २ जानेवारी रोजी घडली आहे. जवानावर खेडगाव (नंदिचे) ता. पाचोरा येथे ३ जानेवारी रोजी सकाळी १०:३० वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. अनिल हेमराज पाटील (वय - ४१) रा. खेडगाव (नंदिचे) ता. पाचोरा असे मयत जवानाचे नाव असुन अनिल पाटील हे सन - २००४ मध्ये सी. आर. पी. एफ. मध्ये भरती झाले होते. सद्यस्थितीत अनिल पाटील हे तळेगाव (पुणे) येथे कर्तव्यावर होते. २ जानेवारी रोजी अनिल पाटील यांचे अकस्मात निधन झाल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच खेडगाव (नंदिचे) या त्यांच्या गावात कळताच गावासह परिसरात शोककळा पसरली. अनिल पाटील यांचे शव ३ रोजी पहाटे शासकीय वाहनातुन खेडगाव (नंदिचे) ता. पाचोरा येथे आणण्यात येणार असुन सकाळी १०:३० वाजता त्यांचेवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. अनिल पाटील यांचे पाश्चात्य आई, वडिल, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, एक भाऊ, भावजयी असा परिवार असुन खेडगाव (नंदिचे) गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

# मानवाधिकार संघटना राष्ट्रीय संघटक मंत्रीपदी सुधीर पाटील

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी



संस्थापक अध्यक्ष सांगेश कुमार भाटीजी यांनी मानवाधिकार संघटना भारतच्या संघटक मंत्रीपदी जळगाव येथील सुधीर सुकलाल पाटील हे गेल्या २ वर्षांपासून संघटनेसाठी करीत असलेल्या धोरणात्मक काम बघून त्यांना पदोन्नती देत सरळ संपूर्ण भारत देश्याच्या संघटन राष्ट्रीय संघटन मंत्री हे पद ऑर्डर जरी केली आहे. संघटनेचे धोरण समोर ठेऊन त्यांनी जिल्हाध्यक्ष पदापासून ते उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष काम करत असतांना गोर गरीब विद्यार्थ्यांना मदत देखील केली आहे. सरकारी कामातील भ्रष्ठ अधिकाऱ्या विरोधात अनेक वेळा त्यांनी आवाज उठवले आहे. त्यांची ऑर्डर शासन प्रशासनातील जिल्हा व राज्यातील मुख्य अधिकाऱ्यांना माहितीत्सव दिलेली आहे. त्यांना सांगेश भाटीजी लक्ष्मण झिमण सोमनाथ नवले व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# नगराध्यक्ष नम्रता पाटील यांनी स्विकारला पदभार

लोकशाही न्यूज नेटवर्क
चोपडा प्रतिनिधी




चोपडा नगर परिषदेच्या नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांनी आज पहिल्या जानेवारीला नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. तालुक्याचे माजी आमदार लता चंद्रकांत सोनवणे व नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या उपस्थितीत आयोजित समारंभात नम्रता पाटील यांनी नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला . यावेळी सर्व निवडून आलेले नगरसेवक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार समारंभावर लता सोनवणे व शिवसैनिकांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष नम्रता पाटील व सर्व निवडून आलेल्या नगरसेवकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी रामनिवास झवर यांनी झालेल्या कामांचे व उर्वरित कामांच्या आराखडा नगराध्यक्ष व माजी आमदार यांच्यासमोर मांडला. त्यानंतर नम्रता पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले, मी जनतेच्या विश्वासावर खरे उतरेन आणि आमदार चंद्रकांत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने चोपड्याचा सर्वांगीण विकास करेन. चोपड्याच्या सर्वांगीण विकास हाच आमच्या देह राहील असे लोकनियुक्त नगराध्यक्ष नम्रता पाटील यांनी सांगितले.



# गरुड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची जैन हिल्स येथे शैक्षणिक भेट

लोकशाही न्यूज नेटवर्क
शेंदुर्णी प्रतिनिधी

आचार्य गजाननराव रघुनाथराव गरुड माध्यमिक विद्यालय, शेंदुर्णी येथील फली (फ्युचर एग्रीकल्चर लीडर्स ऑफ इंडिया) उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांची जैन हिल्स (जैन इरिगेशन सिस्टीम्स), जळगाव येथे शैक्षणिक भेट नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांना आधुनिक शेती, कृषी उद्योग आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळावी, हा या शैक्षणिक भेटीचा मुख्य उद्देश होता.

या शैक्षणिक भेटीत फली मधील इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यावेळी मार्गदर्शन करण्यासाठी आर. के. गरुड, स. कृषी शिक्षक कुलदीप तेलंग उपस्थित होते. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी जैन हिल्स येथील टिश्यू कल्चर प्रकल्प, मायक्रो इरिगेशन प्रणाली, सेंद्रिय शेती प्रकल्प, जलसंधारण व्यवस्था तसेच आधुनिक उत्पादन प्रक्रिया यांची सविस्तर माहिती प्रत्यक्ष पाहून विद्यार्थ्यांनी समजून घेतली. जैन हिल्समधील स्वच्छ, हिरवेगार व पर्यावरणपूरक परिसरामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण झाली. शेती आणि उद्योग यांचा समन्वय कसा साधता येतो, याची प्रत्यक्ष उदाहरणे विद्यार्थ्यांनी अनुभवली. तसेच प्रश्नोत्तर सत्राद्वारे विद्यार्थ्यांनी आपली शंका विचारून स्वतःच्या ज्ञानात अधिक भर घातली. ही शैक्षणिक भेट आचार्य गजाननराव रघुनाथराव गरुड माध्यमिक विद्यालय, शेंदुर्णीचे प्राचार्य. आर. एस. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली.

# मक्याच्या गजाला अज्ञाताने लावली आग

## शेतकऱ्याचा ८० क्किंटल मका खाक

लोकशाही न्यूज नेटवर्क
वरणगाव प्रतिनिधी



भुसावळ तालुक्यातील बोहर्डी शेती शिवारातील शेतकऱ्याच्या शेतातील मक्याच्या गजीला अज्ञात व्यक्तीने आग लावून ८० क्किटल मक्या पिकाचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली. या बाबत तालुक्यातील बोहर्डी ब्रुदुक येथील शेतकरी माधव पांडूरंग झोपे यांच्या शेती शिवार गट नं ११२ / ११३ मधील शेतातील काढलेल्या मका पिकाच्या जगाला आज्ञात व्यक्तीने आग लावल्याने शेतातील ८० क्किंटल मका जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान केले. या बाबत महसुल विभागा कडून घटनेचा पंचनामा करण्यात आला असून शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

# दिव्यांगाच्या कलाविष्काराने जळगावकर भारावले!

## बालरंगभूमी परिषदेचा विशेष मुलांचा महोत्सव 'यहाँ के हम सिकंदर' : जिल्ह्यातील १९ विद्यालयातील ३८० दिव्यांग बालकलावंतांचा सहभाग

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी




दिव्यांग नसून दिव्य असणाऱ्या मुलांसाठी कार्य करणारे सर्वच शिक्षक महान आहेत. या मुलांसाठी ते घेत असलेल्या अपार मेहनतीला माझा सलाम. या मुलांसाठी मलाही काही करता आले तर त्यासाठी मी सदैव तयार आहे. बालरंगभूमी परिषद या विशेष मुलांसाठी करत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार उद्योजक रजनीकांत कोठारी यांनी काढले. बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती आयोजित व जळगाव जिल्हा शाखा संयोजित दिव्यांग महोत्सव 'यहाँ के हम सिकंदर' या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाच्या ऑडिटोरियममध्ये बालरंगभूमी परिषदेचा हा विशेष मुलांच्या कलाविष्काराचा महोत्सव रंगला. प्रारंभी सकाळी १० वाजता महोत्सवाचे उद्घाटन नटराज पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उद्योजक रजनीकांत कोठारी, बँक ऑफ महाराष्ट्राचे प्रबंधक प्रविणकुमार सिंह, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पद्मनाभ म्हस्के, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग जळगावचे सहाय्यक संचालक योगेश पाटील, बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीचे कोषाध्यक्ष नंदकिशोर जुवेकर, प्रभारी प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जळगावचे प्रमुख कार्यवाह विनोद ढगे यांनी केले. या महोत्सवात जिल्ह्यातील १९ विद्यालयातील ३८० दिव्यांग बालकलावंतांनी सहभाग घेत, नृत्य - नाट्य - गायन - चित्रकला आदी कलांनी उपस्थित प्रेक्षकांना भारावून सोडले. समारोप प्रसंगी सहभागी प्रत्येक बालकलावंतांचा प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे सहभागी विद्यालय व संस्थांचा सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. या दिव्यांग मुलांसाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक विद्यालयातील ५ शिक्षकांचाही यावेळी बालरंगभूमी परिषदेतर्फे सत्कार करण्यात आला.

महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा नेहा पवार, कार्यकारिणी सदस्य आकाश बाविस्कर, सुदर्शन पाटील, अवधून दलाल, संतोष पाटील, मोहित पाटील, हर्षल पवार, पंकज बारी आदींनी परिश्रम घेतले.







# अर्थव्यवस्था मजबूत



मागील काही महिन्यापासून जागतिक स्तरावर अर्थजगतात अस्थिर आणि प्रतिकूल असे वातावरण आहे. मात्र याच पार्श्वभूमीवर देशांतर्गत वस्तू उपभोग आणि गुंतवणुकीतील वाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्था हि आगामी काळात देखील मजबूत असणार आहे असे भारतीय अर्थ जगताचे संकेत आहेत. याच पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्थेच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**१. जागतिक स्तरावरील अस्थिर अर्थव्यवस्थेच्या पार्शवभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती काय आहे?**

रझर्व बँकेच्या वतीने नुकताच वित्तीय स्थिरता अहवाल प्रकशित केला गेला आहे. यानुसार देशांतर्गत वस्तू उपभोग आणि गुंतवणुकीतील वाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्था हि आगामी काळात देखील सक्षम आणि मजबूत असणार आहे. रिझर्व्ह बँकेचे केवळ आर्थिक स्थिरता राखणे हेच भविष्यात ध्येय नसून नावीन्य आणि विकासाला चालना देणे,ग्राहकांचे संरक्षण करणे,आणि नियम व देखरेखीसाठी व्यावहारिक दृष्टिकोन ठेवणे हि देखील उद्दिष्ट आहेत.

**२. भारतीय अर्थव्यवस्था स्थिरतेला भक्कम आधार कोणता आहे?**

जागतिक अर्थव्यवस्थेच्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था मात्र सक्षम आणि मजबूत आहे कारण या अर्थव्यवस्थेला भक्कम विकासदर आटोक्यात असलेली महागाई,वित्तीय आणि बिगर वित्तीय व्यवस्थेचे सुदृढ आर्थिक ताळेबंद आणि सरकारच्या धोरणात्मक सुधारणांचा आधार आहे. भविष्यत बाह्य जगातील अस्थिरतेमुळे काही आव्हान निर्माण होऊ शकतील,मात्र संभाव्य धोक्यांपासून अर्थव्यवस्था संरक्षित करण्यासाठी रिझर्व्ह बँक मजबूत सुरक्षा यंत्रणा तयार करेल.

**३. भारतीय अर्थव्यवस्थेला स्टेबल कॉईन्सचा संभाव्य धोका आहे का?**

स्टेबलकॉईन्स चा मोठ्या प्रमाणावर वापर देशाचे चलनविषयक सार्वभौमत्व आणि वित्तीय स्थिरतेसाठी गंभीर धोका निर्माण करू शकतो. स्टेबलकॉईन्समध्ये असलेल्या अंगभूत उणिवेमुळे वित्तीय स्थिरतेसाठी मोठे धोके निर्माण होऊ शकतात. वैध चालनावरील विश्वास हाच वित्तीय स्थिरता टिकवून ठेवण्याचा पाया आहे. परकीय चलनात मूल्य असलेल्या स्टेबल कॉईन्सचा वापर वाढल्यास देशांतर्गत चलनविषयक धोरणावरचे नियंत्रण कमकुवत होऊ शकते.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com

# पटियालाची राजेशाही परंपरा




पंजाब म्हटलं की डोळ्यासमोर मोहरीची शेते, गिद्दा आणि भांगडा नृत्य उभं राहतं. पण पंजाब म्हणजे फक्त इतकंच नाही. पंजाब हे इतिहास, संस्कृती, धर्म आणि निसर्गाचे एक अद्भुत मिश्रण आहे. या राज्याच्या सौंदर्यामुळे इथे एकदा आलेला माणूस पुन्हा-पुन्हा येण्याची इच्छा ठेवतो. तर आज आपण पंजाबमधील अशा ८ ठिकाणांबद्दल जाणून घेऊया, जिथे फिरण्यासाठी परदेशी पर्यटकही आतुर असतात.सुवर्ण मंदिर हे केवळ शिखांचे प्रमुख तीर्थस्थळ नाही, तर जगातील सर्वात शांत आणि आध्यात्मिक ठिकाणांपैकी एक आहे. येथील पवित्र सरोवर, संगमरवरी वास्तुकला आणि २४ तास चालणारे लंगर (मोफत भोजन) जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.भारत-पाकिस्तान सीमेवर होणारी 'बीटिंग रिट्रीट सेरेमनी' एक रोमांचकारी अनुभव आहे. देशभक्तीचा जोश, गर्दी आणि सैनिकांची गर्वाने भरलेली चाल परदेशी पर्यटकांनाही भारावून टाकते.पंजाबच्या रूपनगर जिल्ह्यात असलेले हे ठिकाण शिख धर्माचे जन्मस्थान मानले जाते. तख्त श्री केसगढ साहिब आणि वार्षिक 'होला मोहल्ला' सण इथे खूप प्रसिद्ध आहे. इथे होणारे घोडेस्वारी आणि मार्शल आर्टचे थेट प्रदर्शन परदेशी पर्यटकांना आकर्षित करते.पटियालाची राजेशाही परंपरा, रंगीत बाजार आणि संगीताची परंपरा पर्यटकांना वेगळा अनुभव देतात. इथला किला मुबारक आणि बरदारी गार्डन पाहण्यासारखे आहेत. पटियाला सूट आणि पटियाला पेगसारखे शब्द इथूनच लोकप्रिय झाले आहेत.या शहराला आधी 'रोपड' म्हणून ओळखले जायचे. हे शहर सिंधू संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. इथलं रोपड पुरातत्व संग्रहालय आणि सतलज नदीचा किनारा पक्षीप्रेमींसाठी स्वर्ग मानला जातो.

# चपळ गोम

गोम हा प्राणी संधिपाद संघाच्या अयुतपाद (मिरिॲपोडा) वर्गातील आहे. जगातील सगळ्या उष्ण आणि समशीतोष्ण प्रदेशांत हा आढळतो. बहुतेक गोमा भूचर असून दिवसा जमिनीच्या, दगडधोंड्यांच्या किंवा पालापाचोळ्यांच्या खाली, खडकाच्या भेगांत किंवा घरामध्ये काळोखी तळघर व स्नानगृह अशा ठिकाणी दमट कोपर्यात राहतात. रात्री त्या भक्ष्य शोधण्याकरिता बाहेर पडतात. काही जातीच्या गोमा ओहोटीच्या वेळी उघड्या पडणार्या सागरकिनारपट्टीवरील सागरी वनस्पती, दगड, रिकामे शंख आणि कृमींच्या नळ्या यांमध्ये आढळून येतात.

गोमेची लांबी २.५-१५ सेंमी. असते. शरीर चपटे आणि खंडांनी बनलेले असते. या खंडांची संख्या १५-१८० पर्यंत असू शकते. दक्षिण अमेरिकेत आढळणा-या स्कोलोपेंड्रा जायगेंटी ही गोम २० सेंमी. पर्यंत लांब असते. शरीराचे डोके आणि धड असे दोन स्पष्ट भाग असतात. डोक्यावर लांब स्पर्शेंद्रियाची एक जोडी (स्पृशा), चर्वणाकरिता दंतूर जंभांची (भक्ष्याचे तुकडे करण्याकरिता असणार्या संरचनांची) एक जोडी आणि मुखाकडे अन्न नेण्याकरिता जंभांच्या मागे असणार्या उपांगांच्या म्हणजे जंभिकांच्या दोन जोड्या असतात. धडाचा पहिला खंड आणि शेवटचे दोन खंड वगळून प्रत्येक खंडावर पायांची एक जोडी असते. प्रत्येक खंडावर श्वासरंध्रांची एक जोडी असते. काही गोमांना डोळे नसतात. याखेरीज काहींमध्ये संयुक्त डोळे तर काहींमध्ये डोळ्यांसारखे बिंदू (नेत्रके) असतात. धडाच्या पहिल्या खंडावर एक पोकळ अशी चिमट्याच्या आकाराची विषारी नखांची जोडी असते. पकडलेल्या भक्ष्याच्या अंगात गोम तीक्ष्ण नखे खुपसून विषग्रंथीतील विष सोडते. लहान कीटक



व कृमी हे गोमांचे भक्ष्य होय. गोमेच्या दंशामुळे ताप, चक्कर व डोकेदुखी उद्भवते. मोठ्या गोमेच्या दंशामुळे लहान बालकांचा मृत्यू ओढविण्याचा धोका असतो. घरात आढळणारी व पायांच्या १५ जोड्या असणारी गोम विषारी नाही. उलट घरातील झुरळे, डास, कसर व ढेकूण यांसारख्या उपद्रवी कीटकांना खाऊन गोम माणसासाठी उपकारकच ठरते

# जिल्हा परिषद उर्दू शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद उर्दू मुलांची शाळा क्र. २, मुक्ताईनगर येथे दिनांक ३१/१२/२०२५ रोजी बाल आनंद मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मुक्ताईनगरचे लाडके आ. चंद्रकांत पाटील तसेच उपस्थित सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या मेळाव्यात शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकूण ४० स्टॉल्स उभारले होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या वस्तू, खाद्यपदार्थ व शैक्षणिक साहित्याचे



आकर्षक प्रदर्शन व विक्री केली. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने व उत्साहाने आपली कला व कौशल्य सादर केले, ज्याचे उपस्थित पालक व पाहुण्यांनी मनापासून कौतुक केले. या मेळाव्यातून सर्व ४० स्टॉल्सद्वारे एकूण ₹२०, ०००/- (वीस हजार रुपये) इतकी विक्री झाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक देवाण-घेवाण, संघभावना तसेच आत्मनिर्भरतेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने बाल आनंद मेळावा हा उपक्रम अत्यंत यशस्वी, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला. सदर कार्यक्रमात माफद अध्यक्ष विनोद तराळ, अफसर खान, हकीम चौधरी, डॉ. अजहर अली, हाफिज मोहसीन तसेच नगरपंचायतचे नवर्चित नगरसेवक मुशीर मणियार, मस्तान कुरैशी, लुकमान बेपारी, वसीम खान, हाशम शाह, नईम बागवान, माजी नगरसेवक आसिफ बागवान, जाफर अली, शकील मेम्बर, शरीफ बेपारी, आसिफ पेंटर, शकूर जमादार, सादिक पेंटर, अहमद ठेकेदार, अनिस पटेल, अकिल मुसा, हारून रहीम, शेख रईस, जाकीर जमादार आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग तसेच सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमात शाळाचे शाळा व्यवस्थापन समितीने सहकार्य केले.

# डोलारखेड्यात शौर्य दिन उत्साहात साजरा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

शौर्य दिनानिमित्त भीमसैकांकडून विविध उपक्रम राबवून शौर्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अन्यायाविरोधात प्राणपणाने लढणाऱ्या शूरवीरांना विनम्र अभिवादन करीत मुक्ताईनगर तालुक्यातील डोलारखेडा येथे भीमसैनिकांकडून विजयाची गाथा सांगणारा शौर्यादिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुक्ताईनगर येथील विकी जगन सुरवाडे या तरुणाने शौर्याचे प्रतीक विजय स्तंभ सप्रेम भेट देऊन



समाज जागृतीचे कार्य केले. प्रसंगी गावातून वाजत्री सहित भव्य मिरवणूक काढण्यात आली. दरम्यान विजय स्तंभाची पुष्पहारांनी सजावट करून सामूहिक मानवंदना देण्यात आली. बाहेर गावावरून अनेक प्रतिष्ठीत लोक प्रसंगी हजर होते. संदिप इंगळे सुकळी, अनिल वाघ नांदवेल, अशोक निकम स, र सुनिल खराटे चारठाणा, अमोल बोदडे नाडगाव बोदवड, छबिलदास इगळे उचंदा, पालवे साहेब पुणे चाकण शरद तायडे वरणगाव, राहुल इंगळे निमखेडी बु, नितीन पाटील, पुंडलिक कोळी सुकळी तसेच गावातील शिवाजी वानखेडे, सिध्दार्थ थाटे, बाळु इंगळे, शत्रुघ्न वानखेडे, संजय इंगळे, महेंद्र इंगळे गणपत इंगळे, दुर्योधन सुरवाडे, भरत वानखेडे सुरेश ईगळे अंकुश सुरवाडे व सर्व महिला भगिनी उपस्थित होते.

# ओजस्विनी कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची राज्य कला प्रदर्शनात निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

के.सी.ई. सो.चे ओजस्विनी कला महाविद्यालयातील ए.टी. डी. ( एटीडी) व फाउंडेशन मधील विद्यार्थ्यांची चित्रे ६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनासाठी व स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत राज्यातील सर्व कला महाविद्यालयातून विद्यार्थी सहभाग नोंदवितात. जवळ जवळ २०० हून अधिक कॉलेजातून विद्यार्थी सहभागी होतात. निवड झालेले विद्यार्थी व त्यांच्या कलाकृती खालीलप्रमाणे: प्रेम रविंद्र ठाकरे (ए टी डी. द्वितीय वर्ष): मेमरी (स्मरण) या चित्राची निवड झाली. अक्षय धनराज पाचपांडे (ए टी डी. द्वितीय वर्ष): मूर्तिकार या चित्राची निवड झाली. ऐश्वर्या दशरथ सोनार (फाउंडेशन): रिपलींग आर्ट या चित्राची निवड झाली. हर्षल संजय महाजन (फाउंडेशन): स्टील लाईफ या चित्राची निवड झाली. त्यांचे अभिनंदन प्रशासकीय अधिकारी शशिकांत वडोदकर, प्राचार्य मिलन भामरे, प्रा. पुरुषोत्तम घाटोळ, प्रा. पियुष बडगुजर, प्रा. ऋषिकेश इसाने, प्रा. दिगंबर शिरसाळे व राजेंद्र सरोदे यांनी केले.

# विकासासाठी एकत्र, निधी कमी पडू देणार नाही!

## धरणगाव नगरपरिषदेच्या पदग्रहण सोहळ्यात 'जनहित प्रथम'चा निर्धार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धरणगाव** प्रतिनिधी

धरणगाव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत माय-बाप जनतेने दिलेल्या ऐतिहासिक कौलानंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा पदग्रहण सोहळा आज पालकमंत्री ना गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहपूर्ण व सुसंस्कृत वातावरणात पार पडला. धरणगाव राजकीय, सामाजिक व विकासात्मक वाटचालीत विश्वासाचे नवे पर्व सुरू करणारा हा सोहळा शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. या पदग्रहण सोहळ्यास ना गुलाबराव पाटील संपर्क प्रमुख संजय सावंत शिवसेना उपनेते गुलाबराव वाघ, माजी नगराध्यक्ष सुरेश नाना चौधरी, माजी खासदार उन्मेष पाटील, संघटक करण पवार, भाजपचे नेते पी सी आबा पाटील, मार्केट सभापती प्रेमराज पाटील महाराष्ट्र जनविकास आघाडी चे गटनेते विलास महाजन उद्योजक जीवन आप्पा बायस, नयन शेठ गुजराथी तालुका प्रमुख जयदीप पाटील, शहर प्रमुख भागवत चौधरी, युवासेना जिल्हाप्रमुख, नगरसेवक तथा गटनेते निलेश भाऊ चौधरी, लोकनियुक्त नगराध्यक्ष लीलाताई चौधरी, नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका,इतर स्थानिक स्वराज्य संस्थांचे आजीमाजी पदाधिकारी व सदस्य, नेते, पदाधिकारी, शिवसैनिक, कार्यकर्ते तसेच धरणगाव शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी मार्गदर्शन करताना ना गुलाबराव पाटील यांनी आपल्या मनोगतातून जनतेप्रती असलेली कृतज्ञता व जबाबदारी अत्यंत आदरयुक्त शब्दांत व्यक्त केली. धरणगाव नगरपरिषदेच्या पदग्रहण सोहळ्याच्या निमित्ताने आपणा सर्वांसमोर उभा राहताना मला मनःपूर्वक आनंद व अभिमान वाटत आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत धरणगावच्या सुज्ञ व जागरूक मतदारांनी दिलेला ऐतिहासिक कौल म्हणजे विकास, प्रामाणिकपणा व पारदर्शक कारभाराला दिलेली ठाम व भक्कम साथ आहे,'' असे त्यांनी नमूद केले. धरणगाव जनतेने दिलेला कौल मान्य असून राज्यात ने आदर्श घ्यावा असे पॅटर्न धरणगाव राजकीय नेते स्वीकारले निवडणूक होताच मतभेद विसरून सर्व च विकासासाठी एकत्र येतात हे राज्यातील एकमेव उदाहरण आहे, तसेच लीलाताई याचा भाषणाचा धागा पकडत योगा योगाने संजय सावंत व माझं शर्ट कलर मॅचिंग आहे परंतु त्याचे शर्ट मुंबईला शिवले व माझे जळगांव ला असा मिशीकल टोला देऊन उपस्थित मध्ये हास्यकौल झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना उपनेते तथा जळगाव लोकसभा संपर्क प्रमुख संजय सावंत यांनी या निवडणुकीत जनतेने केवळ लोकप्रतिनिधी निवडले नसून धरणगाव उज्ज्वल भविष्यासाठी स्पष्ट दिशा दिली असल्याचे सांगत त्यांनी सर्व नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. ''ही जबाबदारी अत्यंत मोठी असून जनतेच्या अपेक्षा ही तितक्याच मोठ्या आहेत,'' असे नमूद करून त्यांनी लोकप्रतिनिधींना कर्तव्य, प्रामाणिकपणा व लोकसेवेची जाणीव करून दिली. यावेळी आभार व्यक्त करताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष लीलाताई चौधरी यांनी आता निवडणूक संपली असून सर्वच नगरसेवक यांना विश्वासात घेऊन एकदिलाने काम करू जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे मत व्यक्त करून उपस्थितचे आभार मानले. यावेळी धरणगाव नगरपालिका चा वतीने लोकनियुक्त नगराध्यक्ष यांना प्रशिस्त पत्र देऊन कार्यालयीन अधीक्षक भिकन पारधी व संपूर्ण स्टॉपने सत्कार केला. कार्यक्रम यशस्वीतेते साठी धरणगाव नगरपालिका कर्मचारी वर्ग यांनी केले तर सूत्रसंचालन किरण पाटील यांनी केले

# सावित्रीमाईच्या धाडसाने आजही शिक्षणाचा रथ चालूच!

**भाग :१५**

सावित्रीबाई फुले यांच्या मुलींच्या वार्षिक परीक्षेच्या वेळेसारखी गर्दी प्रेक्षकांची जमली होती. ३००० बघे, टीकाकार, तज्ज्ञ सर्व क्षेत्रातले माहितगार मध्ये इमारतीत व बाहेर मैदानात असंख्य संख्या होती. इंग्रज शासनाकडून या मुलींच्या शासनमान्य शाळा झाल्या. दक्षिणा प्राईझ फंडाकडून वार्षिक ९०० रुपये मंजूर होत असत. आज अँट रूपाने ती रक्कम मिळत असते. मुलींना शिकण्यासाठी शाळेत पाठविल्या तर अन्नाच्या ताटात अळ्या पडतात. स्त्रियांना शिक्षण म्हणजे सामाजिक अधःपतन. स्त्री चंचल, इच्छा मुरली, गैरविश्वासू, विचारशून्य, अविवेकी, अशांत, अशुभ दर्शनी, अध्यात्मात जड जीव (परावलंबी, कोणी हलवले तर हलतो म्हणून जड जीव) वास्तविक पेशव्यांच्या काळात कर्मकांडावर आधारित देवधर्म वाढला. यामुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या समाजव्यवस्थेचीच घडी विस्कटलेली दिसते. नव्हे नव्हे अभ्यासांती सामाजिक इतिहास असाच दिसत होता. याच स्त्रिया पुरुषांच्या गुलाम होत्या हे स्पष्ट होते. स्त्रियांची विचार करण्याची बुद्धीच त्यांच्या कुटुंबप्रमुखांनी बिघडविली. त्यामुळे त्या एकाकी पडल्या गेल्या. दास्यत्व जवळजवळ त्यांनी स्वीकारल्यातच जमा होते. बालविवाह (स्वतः ज्योतीराव फुलेंचा दहाव्या वर्षी गोविंदरावांनी विवाह केला होता.) एवढे या विवाहसंस्थेचे समाजावर तगडे जोखड होते. मुलीला न्हाण न येण्यापूर्वीच विवाह, बालजरठ





विवाह, केशवपन, सतीची प्रथा, विधवा चोळी परिधान बंदी, शारीरिक व मानसिक छळ आणि नवऱ्याच्या प्रचंड ताणतणावाखाली त्यांचा तेज मिरचीच्या कुचमऱ्यासारखा कुचमरा झाला होता. त्या स्त्रिया करपल्या होत्या. येथे ज्योतिबांच्या प्रमुख प्रेरणेने त्यांच्या मार्गदर्शनाने पुढे होऊन सावित्रीबाईनी कधीच झाशी, कधी अहिल्यादेवी होळकर, कधी जनाबाई, तर कधी मीरा बनून वरील समाजावरील केल्या हिंदू धर्मातील रूढी, गेलेल्यावर प्रतिहल्ला, कधी कणखर प्रहार करून या रीतीरिवाज, त्याज्य परंपरा मोडून काढल्या. बंद केल्या.

**परिवर्तनाचे धडे**

**सार्वत्रिक नंतर बारावीपर्यंत मोफत शिक्षणामागे मोठी साधना** :जेवढया धडाडीने सावित्री काकूंनी (कारण त्यांच्या जिव्हाळ्याच्या कार्यप्रणालीमुळे कार्यक्षेत्रात व बाहेरील लोक सावित्रीबाईना काकू म्हणत.) सर्वच समाजातील मुलींसाठी शाळा सुरू केल्या. तेवढयाच नेटाने आज शिक्षणाचा रथ चालू आहे. २००० सालापर्यंत गळतीवर प्रतिबंध म्हणून व शिक्षकांची मरगळ काढण्यासाठी, सार्वत्रिक शिक्षणाचा प्रकल्प राबविला. विद्यार्थ्यांची क्षमता व शिक्षकांचा आत्मविश्वास वाढवून दर्जेदार शिक्षण व्हावे हे शासनाचे उद्दिष्ट होते. एक अध्ययन पुस्तिका छापली. तिला शैक्षणिक भगवदगीता असे नाव दिले. प्रशिक्षण शिबिरे यासाठी घेतली गेली. २१ व्या शतकात दोन दशकानंतर बारावीपर्यंत मोफत शिक्षण ही सिस्टीम राबविण्यास सुरुवात झाली. यामागे सावित्रीबाई काकूंची साधना आहे. त्यांच्या जिद्द आणि कष्टाचे फळ आज स्त्रियांना चाखायला मिळत आहे. त्यांची दूरदृष्टी स्त्रियांच्या सुवर्णालंकारापेक्षा अमौलीक आहे. नवीन शिक्षण युगपर्व आहे. अर्थात सावित्रीबाई काकू युगांधरा ठरतात. शिक्षणक्रांती जननी ठरतात. एखाद्या गोष्टीचा अथवा विषयाचा पारदर्शकपणा त्यांच्या सखोल अभ्यासाने जगासमोर आणता येतो.

**साई ते सब होत है, बंदे कुछ नांह।**
**राईसे पर्वत करे, परबत राई नांह**

विषमतेचे जहरी जंतू (त्यातील अळ्या) शिक्षणाच्या जंतुनाशकाने मारून सावित्रीकाकूंनी राई-सम शिक्षण प्रकल्प राबवून शिक्षणाचा डोंगर उभा केला. त्यामुळे स्त्री स्वतंत्र होऊन शूद्र वंचितांचाही उद्धार झाला व समता चळवळ यशस्वी केली. सहज साधना उभी करून १) वेशभूषेने ऊर्जा निर्मितीत संशोधन करून स्वाती भिसेंनी उत्तम दिग्दर्शक म्हणून नाव कमविले. २) मोतीबाईनी नृत्यांगना व लढवय्यी म्हणून नाव मिळविले. ३) झलकारीबाईनी साथ देऊन झांशी किल्ला जवळ ठेवण्यात राणीला जिंकवले. ४) शुद्रादी महामना द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती बनल्या. सेक्स कॉमेडी अभिनेत्रींच्या अभिनय क्षेत्राचा विषय होऊ शकतो. जाहिरात क्षेत्राचा विषय कदाचित होऊ शकतो. पण स्त्री केंद्रबिंदू मानून मनोरंजन टाळावे. सावित्रीबाई फुले यांचे प्रबोधन कृतकर्म गीतेचा संदेश देते. याचा आदर्श धडा घ्यावा लागेल. महाराष्ट्रात दत्तक पालक योजना सुरू केली गेली. नाना शाळांतून मुलींना दत्तक घेऊन त्यांना सक्तीने पटनोंदणी उपस्थित ठेवून शिक्षणासाठी व भत्त्यासाठी खात्यावर पैसे जमा केले जातात. बसगाड्यात सवलती देऊन मुली शिक्षणात आघाडी घेताना दिसत आहेत ही सावित्रीकाकुबाईची स्फुल्लिंगे देणारी साधना.



वि. ना. चौधरी
वाघोड ता. रावेर
मो. ९५७९००६१५७

## वैभव चोपडेची ८३ दिवसांत नर्मदा परिक्रमा पूर्ण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मलकापुर** प्रतिनिधी



येथील श्री छत्रपती शिवाजी नगरातील रहिवासी तरुण वैभव प्रमोद चोपडे याने ८३ दिवसांत नर्मदा परिक्रमा पूर्ण केली. त्या अनुषंगाने आगमन प्रसंगी रांगोळीची आरास, वाद्यांच्या गजरात, सौभाग्यवतींनी औक्षण करून दि. ३० डिसेंबर रोजी अभूतपूर्व स्वागत करण्यात आले आहे. वैभव चोपडे याने माता नर्मदेची परिक्रमा करण्याचा संकल्प केला. व तो पूर्ण करण्यासाठी तो मार्गस्थ झाला होता. तब्बल ३ हजार ८०० किलो मीटरचा प्रवास त्याने ८३ दिवसांत पूर्ण केला आहे.

## महत्वाचे

### जिल्ह्यात १४ जानेवारी पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी

**जळगाव –**
जळगाव जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मतमोजणी तसेच विविध स्वरुपाची सण, उत्सव, थोर पुरुषांच्या जयंती या साजऱ्या होणार आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे प्रतिबंधात्मक आदेश दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ००.०१ वाजेपासून ते १४ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत लागू राहणार आहे. आदेशान्वये शस्त्र बाळगणे, स्फोटके, धोकादायक वस्तू वापरणे, प्रतिमा दहन तसेच पोलिस अधिक्षक, जळगाव यांच्या पुर्व परवानगी शिवाय सभा घेण्यास किंवा मिरवणुका काढण्यास बंदी घालण्यात आली आहे. सरकारी कार्यक्रम, अंत्ययात्रा, लग्न समारंभ व धार्मिक मिरवणुका तसेच शासनाच्या सेवेतील व्यक्तीना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यारे बाळगणे आवश्यक आहे, त्यांना हा आदेश लागू राहणार नाही,असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### दोन कारागीर ३१ लाखांचे सोने घेऊन फरार

**जळगाव –**
शहराची ओळख असलेल्या सुवर्णनगरीच्या सराफ बाजारात फसवणुकीची एक मोठी घटना उघडकीस आली आहे. सोनारकाम करणाऱ्या एका व्यावसायिकाचा विश्वास संपादन करून, तब्बल ३१ लाख ६९ हजार रुपयांचे सोने घेऊन दोन कारागीर पसार झाले आहेत. याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींच्या शोधासाठी पोलिसांचे पथक पश्चिम बंगालला रवाना होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जोशी पेठ परिसरात राहणारे तोटन बलराम मायती (वय ५१) हे सोनारकाम करून आपला उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे पश्चिम बंगालमधील असित गंगाबाला मन्ना आणि तापस रूपचंद मन्ना (रा. बंशकल, जि. पश्चिम मेदिनीपूर) हे दोन कारागीर कामाला होते. ४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास फिर्यादी मायती यांनी या दोघांवर विश्वास ठेवून मंगळसूत्र बनवण्यासाठी २० कॅरेट शुद्धतेचे एकूण २९७.१०० ग्रॅम सोने दिले होते. मात्र, दागिने बनवण्याच्या बहाण्याने घेतलेले हे सोने परत न करताच दोन्ही आरोपींनी जळगावातून पळ काढला. अनेक दिवस कारागिरांचा शोध घेऊनही त्यांचा ठावठिकाणा न लागल्याने, आपली ३१ लाख ६९ हजार ४१२ रुपयांची फसवणूक झाल्याचे मायती यांच्या लक्षात आले. अखेर त्यांनी ३१ डिसेंबर रोजी शनिपेठ पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी असित मन्ना आणि तापस मन्ना यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# साग, बांबुची तस्करी, वनविभागाची कुभकर्णी झोप

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**किनगाव ता. यावल** प्रतिनिधी

येथुन जवळ असलेल्या सातपुड्यात इतर वृक्षतोडी बरोबर साग व बांबुची मोठ्या प्रमाणात तस्करी केली जात आहे. अनेक दिवसापासुन सातपुडा पर्वतास वृक्षतोडीचे जणु काही ग्रहण लागल्यामुळे एकेकाळचा घनदाट जंगल असलेला हा परिसर आता भकास दिसत आहे. किनगाव नायगाव येथुन जवळ असलेल्या सातपुडा पर्वतात अतिशय मौल्यवान साग व बांबु आहेत. सागवानी लाकडाची किंमत आज बाजारपेठेत सोन्याहुनही अधिक आहे. भुतकाळात सातपुडा पर्वतात सागवानी वृक्ष म्हणजे त्याचे वैभव दिसायचे परंतु आज परीस्थीती वेगळीच आहे. नविन इमारती लाकडापासुन घरातील सजावटीच्या गृहउपयोगी वस्तू बनविण्यासाठी लोक आजही सागवानी लाकडाना प्रथम प्राधान्य देतात. काही अशिक्षीत बेरोजगारांना पैशाचे आमीष दाखवून सातपुड्यातुन या मौल्यवान लाकडाची अवैध्य वाहतुक करीत असतात. हे सर्व कुभकर्णी झोपेत असलेल्या वनखात्याच्या कामगीरीमुळे अवैध्य वाहतुकदारांना हे काम आधिक सुलभ व सोयीचे झाले आहे.

आतोनात वृक्षतोडी मुळे जवळ पास असलेले सागवानी वृक्ष नष्ट झालेले पहावयास मिळतात सागवानाची तोड व वाहतुक आता सातपुड्याच्या दऱ्या खोऱ्यातून सर्रास केली जात असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. तसेच येथील व परीसरातील अवैध धंदेवाल्याकडे यथील काही कर्मचाऱ्यांची टक्केवारीही ठरलेली असल्याचे पर्यावरण प्रेमीकडून सागण्यात येते. आणि म्हणूनच की काय सागवानी वृक्ष तोडुन अवैध वाहतुक सुरू आहे. त्याच प्रमाणे सातपुड्यातुन बांबुची सुद्धा मोठ्या प्रमाणावर तोंड होत असुन हा व्यवसाय परीसरातील व्यापारी हगामी व्यवसाय म्हणून करीत असतात. या



कारणामुळे सातपुडा पर्वतामधील सागवानी वृक्ष संपुष्टात येणार असल्याचे शक्यता नाकारता येत नसुन त्यावर उपाय म्हणून कडक नियोजनाची गरज असल्याची भावना सुरेश पाटील यांच्यासह पर्यावरण प्रेमींनी केली आहे.

# पठाणकोट एक्सप्रेसच्या पूर्ववत थांब्यासाठी आक्रोश आंदोलन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**खिर्डी ता. रावेर** प्रतिनिधी

मुंबई –अमृतसर या दोन्ही बाजूने जाणाऱ्या पठाणकोट एक्सप्रेसला कोरोना काळापूर्वी निंभोरा रेल्वे स्टेशनवर असलेला थांबा पूर्ववत सुरु व्हावा या मागणीसाठी निंभोरा गाव व परिसर सेवा समितीच्या वतीने तीन टप्प्यांत कृती आंदोलन जाहीर करण्यात आले आहे.

येथील माजी उपसरपंच तथा विवेक ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन होणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु असणाऱ्या पठाणकोट या गाडीला निंभोरा येथे दोन्ही बाजूने थांबा होता. कोरोनानंतर पठाणकोट एक्सप्रेस गाडी येथे थांबणे अचानक बंद करण्यात आल्याने निंभोरा येथून भुसावळ मुंबई तसेच जळगाव- भुसावळहुन निंभोरा व पुढे बुऱ्हाणपूर-खंडवा प्रवास बंद झाला असून, कामधंद्यासाठी ये-जा करणारे चाकरमाने तसेच व्यापारी अशा विविध सोयीच्या प्रवासी वर्गाचे हाल होत आहेत. -पाच वर्षात स्थानिक खासदार व आमदार तसेच रेल्वे अधिकाऱ्यांना अनेकवेळा विनंती निवेदने देऊन सुद्धा याबाबत




दुर्लक्ष केले जातं असल्याने रेल्वे प्रशासनाने दखल न घेतल्यास येत्या २६ जानेवारी रोजीच्या प्रजासत्ताक दिनी रेल रोको आणि थेट जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे.

रेल्वे प्रशासनाला जाग येण्यासाठी आक्रोश म्हणून पंचक्रोशीतील नागरिकांनी आक्रोश आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा भाग्यश्री ठाकरे यांनी आवाहन केले आहे. ०३ जानेवारी रोजी पंचक्रोशीतील विविध १० गावांमध्ये मागणी निवेदनावर सह्यांची मोहीम राबविण्यात येईल. ०४ जानेवारी रोजी स्थानिक आमदार, खासदार व मंत्री यांना प्रत्यक्ष आणि सर्व रेल्वे अधिकारी यांना ई -मेलवर २५ जानेवारी पर्यंत दोन्ही बाजूने जाणारा पठाणकोट एक्सप्रेस निंभोरा येथे थांबण्याचा अल्टीमेटम असणारे सह्यांची निवेदने देण्यात येतील. जर निवेदनाची दखल घेतली नाही तर येत्या २६ जानेवारी रोजी प्रजाकसत्तादिनी निंभोरा येथे रेलरोको व जेलभरो आंदोलन करण्यात येऊन जोपर्यंत थांबा पूर्ववत लागू झाला असे आदेश रेल्वे प्रशासन निर्गमित करीत नाहीत तोपर्यंत जेलभरोमध्ये कारवाई झालेले आंदोलक जामीन घेणार नाहीत, असे या आक्रोश आंदोलनाचे स्वरूप राहणार आहे. विदर्भ, मध्य प्रदेशातून अनेक रुग्ण औषधी घेण्यासाठी येतात औषधी घेतल्या नंतर बरे ही होतात विशेष म्हणजे या औषधीचे एक ही रुपया या पाटील कुंटुबीयानी घेत नाही लांबुन आल्या नंतर औषधीचे पैसे घेत नाही असे हाडाचे अनेक औषधी देणारे वयाच्या ७५ वर्षी जग सोडून गेले. वनस्पती सहज उपलब्ध होत नसल्याने पाटील कुंटुबीयाना यासाठी ती वनस्पती शोधण्यासाठी मेहनत घ्यावी, त्यांच्या पश्च्यात तीन मुल एक मुलगी, सुना, नातवडे असा परिवार असून ते रत्नाकर व भुषण पाटील यांचे वडील होत. यापुढेही सर्वधर्मसमभाव हा मूलमंत्र समोर ठेवून ही सेवा निरंतर सुरूच राहणार आहे. पाटील याची निस्वार्थ ही येणाऱ्या पिढी साठी प्रेरणा ठरेल अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# दिपाली कुंभारची आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी ता. जामनेर** प्रतिनिधी

येथील गरुड महाविद्यालयाची विद्यार्थिनी कू. दिपाली कुंभार हिने अविष्कार या आंतरमहाविद्यालयीन संशोधन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरासाठी निवड होण्याचा बहुमान मिळवला आहे. राज्यस्तरीय स्पर्धा ही परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठात होणार आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे गरुड महाविद्यालयाचा नावलौकिक वाढला असून, महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिपाली कुंभार हिने शॉपिंग कॉम्प्लेक्ससह एकात्मिक उड्डाणपूल या नाविन्यपूर्ण व समाजोपयोगी विषयावर




आपला संशोधन प्रकल्प सादर केला. वाढती शहरीकरण प्रक्रिया, वाहतूक कोंडी, उड्डाणपुलाखालील जागेचा अपुरा वापर आणि रोजगाराच्या संधींचा अभाव या समस्यांवर उपाय म्हणून तिने ही संकल्पना मांडली आहे. या प्रकल्पातून शहरी भागातील जागेचा बहुउद्देशीय वापर, वाहतूक व्यवस्थापन सुधारणा तसेच स्थानिक व्यवसायांना चालना देण्याचा विचार प्रभावीपणे सादर करण्यात आला. दिपाली समवेतच रंजना कुमावत भूमिका जोशी काजल तडवी या विद्यार्थिनींची सुद्धा निवडणुकीत विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेसाठी झाली होती या विद्यार्थिनी सुद्धा त्यांचे विषय चांगल्या पद्धतीने परीक्षकांसमोर मांडले.

या संशोधनासाठी दिपाली कुंभार हिला मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. योगिता चौधरी यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रकल्प अधिक अभ्यासपूर्ण, तांत्रिकदृष्ट्या सक्षम व सादरीकरणाच्या दृष्टीने प्रभावी ठरला. या यशाबद्दल गरुड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संजय भोळे यांच्या हस्ते दिपाली कुंभार हिचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन संजय गरुड, व्हाइस चेअरमन मा. आबासाहेब भीमराव शेळके, सचिव सागरमल जैन, सह सचिव यू. यू. पाटील, कार्यालयीन सचिव दीपक गरुड तसेच सर्व संचालक मंडळाने दिपाली कुंभार व गरुड महाविद्यालयाचे मनः पूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शिक्षिका विद्या जोशी यांची राज्यस्तरावर निवड

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एस.सी.ई.आर. टी.) यांच्यावतीने शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी यंदा प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांद्रा ता. पाचोरा येथील



उपशिक्षिका विद्या सचिन जोशी यांची राज्यपातळीवर निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हे यश अत्यंत अभिमानास्पद मानले जात आहे.

सध्या राज्यभर शिक्षक कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व बौद्धिक क्षमतेला चालना देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या माध्यमातून यंदा प्रथमच क्रीडा स्पर्धा राबविण्यात आल्य.

# हाड जोडणाऱ्या अशोक पाटील यांचे निधन

**तिसऱ्या पिढीपासून सुरू आहे मोफत सेवा : आजवर असंख्य रुग्णांना मिळाला लाभ**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरणगाव** प्रतिनिधी

हाडाचे सर्वच उपाय संपल्यानंतर गरजवंत सरळ भुसावळ तालुक्यातील विल्हाळे गावात आशोक पाटील याचे घर गाठून त्यांच्याकडून अगदी मोफत आयुर्वेदिक औषध घेतल्यानंतर कितीतरी हाडाचे दुखणे बरे करणारे वयाच्या ७५ वर्षी ते जग सोडून गेले. मात्र त्यांच्या तीन पिढ्या पासुन सुरू असलेली निरंतर सेवा तसीच पुढे सुरू राहील. हे खरे असले तरी त्यांच्या जाण्याने परिवारात व आयुर्वेदिक उपचार घेणाऱ्यात पोकळी निर्माण झाली आहे.



भुसावळ तालुक्यातील वेल्हाळे हे गाव तसे विकासापासुन दुर जरी असले तरी गावाचे अतिपुरातन हेंबाडपंथी मंदिर सर्वत्र प्रसिद्ध आहे. तसच अजून एका झाडापासून तयार होणार आयुर्वेदिक औषधीसाठी सर्वत्र परिचीत आहे. गेल्या तिन पिढ्यांपासून आशोक सकाराम पाटील (वय ७४ ) हे हाडांच्या उपचारासाठी झाडाच्या पान, मुळा पासुन तयार केलेल आयुर्वेदिक औषधी रुग्णाना अगदी मोफत सेवा देत होते.

वैद्यकिय उपचार संपल्या नंतर माणुस आपले दुखणे बरे होण्यासाठी वाटेल तो पर्याय निवडल्या जातात. अपघातात हाड मोडले की विल्हाळे गावात जळगाव जिल्ह्यासह मराठवाडा, विदर्भ, मध्य प्रदेशातून अनेक रुग्ण औषधी घेण्यासाठी येतात औषधी घेतल्या नंतर बरे ही होतात विशेष म्हणजे या औषधीचे एक ही रुपया या पाटील कुंटुबीयानी घेत नाही लांबुन आल्या नंतर औषधीचे पैसे घेत नाही असे हाडाचे अनेक औषधी देणारे वयाच्या ७५ वर्षी जग सोडून गेले. वनस्पती सहज उपलब्ध होत नसल्याने पाटील कुंटुबीयाना यासाठी ती वनस्पती शोधण्यासाठी मेहनत घ्यावी, त्यांच्या पश्च्यात तीन मुल एक मुलगी, सुना, नातवडे असा परिवार असून ते रत्नाकर व भुषण पाटील यांचे वडील होत. यापुढेही सर्वधर्मसमभाव हा मूलमंत्र समोर ठेवून ही सेवा निरंतर सुरूच राहणार आहे. पाटील याची निस्वार्थ ही येणाऱ्या पिढी साठी प्रेरणा ठरेल अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# हुतात्मा वीरभाई कोतवाल यांना अभिवादन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

संत सेना नाभिक हितवर्धक संघ जळगाव शहर संघटनेतर्फे दिनांक २-१ -२६ शुक्रवारी रोजी सकाळी हुतात्मा बॅरिस्टर वीरभाई कोतवाल पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सकाळी हुतात्मा वीर भाई कोतवाल चौक गोविंदा रिक्षा स्टॉप येथे प्रतिमा पूजन करण्यात आले. अध्यक्ष महारु इसे यांनी प्रास्ताविक केले. शांताराम खोंडे, राजेंद्र सूर्यवंशी, सुनील जगताप यांनी प्रतिमेचे पूजन केले. मुंबई प्रदेश उपाध्यक्ष किशोर सूर्यवंशी, जीवा सेना युवक प्रदेश अध्यक्ष देविदास फुलपगारे, सचिव



राजकुमार गवळी यांनी हुतात्मा बॅरिस्टर वीरभाई कोतवाल यांच्या जीवन चरित्रावर माहिती दिली. जळगाव शहर संघटनेचे सचिव अनिल निकम यांनी सूत्रसंचालन, मनीष कुवर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजकुमार महाले, अरुण निकम, संजय चित्ते, पद्माकर निकम, नितीन खोंडे यांनी प्रयत्न केले. युवराज खोंडे, कुमार सिरामे, अरुण वसाने, संदीप निकम, अनिल सूर्यवंशी, सुनील पवार, शिवाजी चव्हाण, छगनराव सूर्यवंशी, शशिकांत मानकरी, शरद श्रीखंडे, सुरेश कुवर, सुरेश निकम, रावजी आंबेकर, अलका सोनवणे आदी समाज बांधव उपस्थित होते.

# बॅरिस्टर वीर भाई कोतवाल पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**नवनियुक्त नगराध्यक्षा यांची प्रमुख उपस्थिती : समाजातर्फे नम्रता पाटील यांचा जाहीर सत्कार**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

दिनांक दोन जानेवारी रोजी श्री संत सेना नाभिक हितवर्धक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हुतात्मा बॅरिस्टर वीर भाई कोतवाल यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील या होत्या तर अध्यक्षस्थानी माजी सैनिक अविनाश त्रंबक साळुंखे हे होते. सुरुवातीला संत शिरोमणी सेना महाराज, वीर जिवाजी महाले, बॅरिस्टर वीर भाई कोतवाल यांच्या प्रतिमेचे माल्यार्पण करून प्रतिमा



पूजन करण्यात आले.
नवनियुक्त लोकनियुक्त नगराध्यक्षा नम्रता पाटील यांचा सत्कार श्री संतसेना नाभिक समाजाचे अध्यक्ष उमाकांत मधुकर निकम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर नवनियुक्त नगरसेवक अमोल साहेबराव पाटील, भारती सुनील चौधरी, हुसेन पठाण, अकील जाहगीरदार मा. उपनगराध्यक्ष विकास पाटील आणि नायब तहसीलदार शिरीष सैंदाणे, सुनील चौधरी, श्याम परदेशी, संजय जैन, आणि उद्योजक सचिन रविंद्र पाटील हे उपस्थित होते. नवनियुक्त नगरसेवकांचा यावेळी संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांनी वीर भाई कोतवाल यांचा जीवनपट सांगून स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान सांगितले. श्री. संत नाभिक संस्थेचे अध्यक्ष यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा लेखाजोखा मांडला नवनियुक्त नगराध्यक्षा नम्रता सचिन पाटील यांना ही भावी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. आणि वीर भाई कोतवाल यांच्या जीवनावर माहिती सांगितली. यावेळी व्यासपीठावरील उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. लोकशाहीचे पत्रकार मिलिंद सोनवणे यांनी वीर भाई कोतवाल यांचे शिक्षण आणि देशासाठी त्यांचे योगदान यावर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम श्री संत सेना नाभिक हितवर्धक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मधुकर निकम, उपाध्यक्ष राहुल भीमराव निकम, शत्रुघ्न सोनवणे (सचिव) राजेंद्र फकिरा येशी, (खजिनदार)राजेंद्र अभिमन सोनगिरे, दीपक पंजाबराव साळुंखे, भरत देवराम जाधव, महेंद्र रामचंद्र सैदाणे, विलास पांडुरंग निकम यांनी आयोजित केला होता. यावेळी थोर सेनानी वीर भाई कोतवाल यांच्या स्मारकास ही अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास संजय रामभाऊ निकम, सुनील सोनगिरे, अर्जुन पुंडलिक निकम, लक्ष्मण शैदाणे, मनोहर बन्सीलाल सोनगिरे, सोपान काशिनाथ बाविस्कर, ज्ञानेश्वर रामदास सोनवणे, अनिल नारायण पवार, सुभाष भिला शेंदाणे, हिरालाल सोनवणे, किशोर सैंदाणे, धनराज त्रम्बक पगारे, देविदास सुखदेव बाविस्कर, अनिल शेंदाणें, प्रमोद भट्टू सोंनगीरे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उमाकांत निकम राजेंद्र येशी, राहुल निकम यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जाधव यांनी केले. तर आभार रवींद्र सैंदाणे यांनी मांडले.

लोक लाईव्ह BREAKING NEWS

## बीजे मार्केटमध्ये किरणा दुकान फोडले!

**जळगाव :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जुने बी.जे मार्केट परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, एका किराणा दुकानाचे शटर उचकटून ५१ हजार रुपयांचा माल लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मार्केटमधील गाळा क्रमांक १७७-१७८ मध्ये जगदीश रामकृष्ण वाणी (वय ५०, रा. टिळक नगर) यांचे राजेंद्र प्रोव्हिजन नावाचे किराणा दुकान आहे. २७ डिसेंबर २०२५ च्या रात्री १०.३० वाजेच्या सुमारास वाणी यांनी दुकान बंद केले होते. दरम्यान, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे लोखंडी शटर उचकटून आत प्रवेश केला. दुसऱ्या दिवशी, २८ डिसेंबर रोजी सकाळी १०.१५ वाजता वाणी हे दुकान उघडण्यासाठी आले असता, त्यांना चोरी झाल्याचा प्रकार लक्षात आला. चोरट्यांनी दुकानातील विविध प्रकारचे किराणा सामान आणि माल चोरून नेला असून, त्याची एकूण किंमत ५१ हजार ६० रुपये इतकी आहे. पोलीस हवालदार वंदना चव्हाण या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## आज अवकाशात 'सुपर मून'ने उजळणार रात्र!

**नवी दिल्ली :** नववर्ष २०२६ च्या सुरुवातीलाच अर्थात उद्या ३ जानेवारी रोजी वर्षातील पहिले पौर्णिमेचे चंद्रदर्शन घडणार आहे. या दिवशी वर्षातील पहिला सुपरमून असेल. तो इतर पौर्णिमेपेक्षा खूप मोठा असेल. याला वुल्फ मून असेही म्हणतात. विशेष म्हणजे, या दिवशी चंद्र पृथ्वीच्या अत्यंत जवळ येणार असल्याने तो 'सुपरमून'च्या रूपात अवकाशात तळपताना दिसेल. स्वच्छ आकाश असल्यास संपूर्ण देशभरात हे विहंगम दृश्य दिसेल. हा केवळ २०२६ चा पहिलाच पूर्ण चंद्र नसेल, तर वर्षातील सर्वात मोठा आणि तेजस्वी चंद्र असणार आहे. या दिवशी चंद्र त्याच्या कक्षेतील पृथ्वीपासूनच्या सर्वात जवळच्या बिंदूवर असेल. त्यामुळे तो सामान्य पौर्णिमेच्या चंद्रापेक्षा साधारण १४ टक्के मोठा आणि ३० टक्के अधिक तेजस्वी दिसेल. भारतीय प्रमाणवेळेनुसार ३ जानेवारी रोजी दुपारी ३:३३ वाजता चंद्र पूर्णत्वास पोहोचेल. मात्र, भारतात याचे खरे विलोभनीय रूप सूर्यास्तानंतर, म्हणजेच चंद्रोदयाच्या वेळी पाहायला मिळेल. २ आणि ३ जानेवारीच्या संध्याकाळी चंद्र पूर्व क्षितिजावर नेहमीपेक्षा थोडा खाली दिसेल. यामुळे उगवणारा चंद्र आकाराने मोठा, अधिक सोनेरी आणि पृथ्वीच्या अगदी जवळ असल्यासारखा वाटतो. भारतात संध्याकाळी ६ ते ७ च्या सुमारास हा सुपरमून दिसू लागेल आणि रात्रभर आकाशात प्रकाशमान असेल.

## ठाण्यात मनसे, उबाठा उमेदावारांचे अर्ज बाद

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका निवडणुकीत राज ठाकरे यांच्या मनसेला आणि उबाठाला मोठा धक्का बसला आहे. उमेदवारी अर्जांच्या छाननीदरम्यान दोन्ही पक्षांच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा अर्ज अवैध ठरवण्यात आला आहे. यानंतर दोन्ही पक्षांनी निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त करत गंभीर आरोप केले आहेत. ठाण्यातील प्रभाग क्रमांक १७ मधून शिंदे गटाचे उमेदवार मनोज शिंदे यांच्याविरोधात निवडणूक लढवणाऱ्या उबाठाच्या उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला. सही नसणे आणि बँक स्टेटमेंट न सादर केल्याचे कारण देत अर्ज अवैध ठरवण्यात आल्याचे संबंधित उमेदवाराने सांगितले. तसेच, छाननीवेळी नवीन प्रतिज्ञापत्र सादर करण्याची संधी देण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला. अर्ज भरण्याची मुदत संपायला अवघे दहा मिनिटे असताना मला कागदपत्रे आणायला सांगण्यात आले. मी गरीब घरातून आलो असून माझ्यावर अन्याय झाला, असा आरोप उमेदवाराने केला. दरम्यान, प्रभाग क्रमांक १८ मधून मनसेच्या उमेदवार प्राची घाडगे यांचाही उमेदवारी अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. आवश्यक कागदपत्रे उशिरा असल्याचे कारण देत अर्ज अवैध ठरवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. आम्ही कागदपत्रे वेळेत आणली होती, मात्र पोलिसांनी आत प्रवेश नाकारला. नंतर आत सोडल्यावर निवडणूक अधिकाऱ्यांनी आमचे म्हणणे ऐकून न घेता अर्ज बाद केला, असे प्राची घाडगे यांनी सांगितले.

# 'ताई, माई, अक्का' विचार करा पक्का; प्रचारतोफा सज्ज!

### महापालिकेच्या रणधुमाळीत आश्वासनांची आतषबाजी

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

शहर पुन्हा एकदा राजकीय रणांगणात उतरले आहे. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांच्या माघारीचा आज शेवटचा दिवस पार पडताच, शहरातील वातावरण क्षणार्धात बदलले आहे. आतापर्यंत पडद्यामागे सुरू असलेली हालचाल आता उघडपणे रस्त्यावर उतरणार असून, 'ताई, माई, अक्का' अशा हाकांनी गल्लीबोळांत प्रचाराचा गदारोळ वाढणार आहे. येत्या काही दिवसांत जळगावकरांवर आश्वासनांचा भडीमार, आरोप-प्रत्यारोपांची सरबत्ती आणि शक्तिप्रदर्शनाचे फटाके फुटताना दिसणार आहेत.

यंदाच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची झाली आहेत. एकीकडे भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीने कंबर कसली आहे, तर दुसरीकडे राष्ट्रवादी (शरद पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची आघाडी मैदानात उतरली आहे.




दोन्ही बाजूंनी 'आम्हीच विकासाचे खरे शिल्पकार' असा दावा केला जात असून, मतदारांच्या मनावर प्रभाव टाकण्यासाठी प्रत्येक जण वेगवेगळे मुद्दे पुढे करत आहे.

महायुतीने नववर्षाच्या तोंडावर बिनविरोध नगरसेवकांचे खाते उघडत आघाडी घेतली आहे. काही प्रभागांत उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने महायुतीचे पारडे सध्या जड आहे. विकासकामांची शृंखला, निधीची उपलब्धता आणि सत्तेचा अनुभव हे मुद्दे महायुतीच्या प्रचाराचे केंद्रबिंदू असणार आहेत. मात्र, चित्र इतके सरळ नाही. अनेक प्रभागांत बंडखोरीचे वारे अजूनही शांत झालेले नाहीत. नाराज उमेदवार, स्थानिक नेत्यांचे अंतर्गत वाद आणि गटबाजी यामुळे काही ठिकाणी महायुतीसमोरच अडचणी उभ्या राहण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, विरोधी आघाडीनेही या संधीचे सोने करण्याचा निर्धार केला आहे. सत्ता असूनही शहराचा अपेक्षित विकास झाला नाही, मूलभूत सुविधा अपुऱ्या राहिल्या असा आरोप करत ते मतदारांमध्ये असंतोष पेटवण्याचा प्रयत्न करणार आहेत. पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापन, ड्रेनेज, वाहतूक कोंडी, अतिक्रमणे आणि बेरोजगारी हे मुद्दे प्रचारात अग्रक्रमाने येणार आहेत. 'जळगावचा खरा आवाज' अशी प्रतिमा उभी करण्याचा आघाडीचा प्रयत्न असेल.

यंदा उमेदवारांची संख्या लक्षणीय वाढल्याने प्रत्येक प्रभागात प्रचाराची धूम राहणार आहे. लहान-मोठ्या सभा, कोपऱ्यावरच्या बैठका, प्रचार फेऱ्या, रॅली, रोड शो, फ्लेक्स आणि बॅनर यामुळे शहराचा प्रत्येक चौक राजकीय रंगात रंगणार आहे. काही प्रभागात तर एकाच रस्त्यावर वेगवेगळ्या पक्षांचे प्रचार वाहन, ढोल-ताशे, घोषणा आणि कार्यकर्त्यांची गर्दी पाहायला मिळणार आहे. वरिष्ठ नेत्यांच्या कॉर्नर सभा आणि अचानक होणारे दौरे प्रचारात रंगत आणतील.




### 'डिजिटल फायरिंग' होणार!

'आपल्या हक्काचा माणूस', 'पाच वर्षांत प्रभागाचा कायापालट' अशा भावनिक आणि विकासाभिमुख घोषणा मतदारांच्या कानावर सतत पडणार आहेत. घराघरांत जाऊन प्रचार, महिलांसाठी खास बैठका, युवकांसोबत संवाद, ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळे कार्यक्रम असे वेगवेगळे फॉर्म्युला वापरले जाणार आहेत. सोशल मीडियावरही प्रचाराचा वेग वाढणार असून, व्हिडीओ, पोस्टर, थेट प्रक्षेपण आणि आरोपांची 'डिजिटल फायरिंग' सुरू होईल.

### आरोप-प्रत्यारोप होणार तीव्र

प्रचार जसजसा तापत जाईल, तसतसे आरोप-प्रत्यारोपही तीव्र होतील. 'कोणाचा विकास, कोणाची लूट?', 'खोटी आश्वासने आणि अपूर्ण प्रकल्प', 'नगरसेवक की ठेकेदारांचा प्रतिनिधी?' असे सवाल एकमेकांवर फेकले जातील. काही ठिकाणी वैयक्तिक आरोपांपर्यंत मजल जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, मतदार नेमका कोणत्या मुद्द्याला प्राधान्य देतो, हे निकालाच्या दिवशीच स्पष्ट होणार आहे.

### कुणाला मिळणार संधी?

महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी यंदा मोठी चुरस निर्माण झाली आहे. कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळेल का, की पुन्हा एकदा आघाडी-युतींचे राजकारण रंगेल, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. निवडणूक केवळ नगरसेवक निवडण्यापुरती मर्यादित न राहता, आगामी काळातील स्थानिक राजकारणाची दिशा ठरवणारी ठरणार आहे. महापालिकेची निवडणूक म्हणजे विकासाच्या आश्वासनांची, राजकीय ताकदीच्या प्रदर्शनाची आणि मतदारांच्या विश्वासासाठी चाललेली चुरशीची लढाई ठरणार आहे. पुढील काही दिवस शहरात प्रचारतोफांचे आवाज घुमणार, घोषणा आसमंतात दरवळणार आणि जळगावकर 'कोणाला संधी द्यायची?' याचा विचार करत मतदानाच्या दिवसाकडे वाटचाल करणार आहेत.

## जिल्ह्यात 14 जानेवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

जिल्ह्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मतमोजणी तसेच विविध स्वरुपाची सण, उत्सव, थोर पुरुषांच्या जयंती या साजऱ्या होणार आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

हे प्रतिबंधात्मक आदेश दि. १४ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. आदेशान्वये शस्त्र बाळगणे, स्फोटके, धोकादायक वस्तू वापरणे, प्रतिमा दहन तसेच पोलिस अधिक्षक, जळगाव यांच्या पुर्व परवानगी शिवाय सभा घेण्यास किंवा मिरवणुका काढण्यास बंदी घालण्यात आली आहे. सरकारी कार्यक्रम, अंत्ययात्रा, लग्न समारंभ व धार्मिक मिरवणुका तसेच शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यारे बाळगणे आवश्यक आहे, त्यांना हा आदेश लागू राहणार नाही, असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## गोदावरी नर्सिंग कॉलेजमध्ये 35 दात्यांचे रक्तदान

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

नूतन वर्षाच्या स्वागतार्थ गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये राष्ट्रीय सेवा योजना युनिट, रेड रिबन क्लब आणि युथ रेड क्रॉस विंग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण ३५ विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट दर्शन घडविले.



वर्ष नवे, संकल्प नवे या संकल्पनेखाली विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातही अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. शिबिरासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालय, जळगाव (रक्तपेढी विभाग) यांचे सहकार्य लाभले.

## 'थर्टी फर्स्ट'ला 512 तळीरामांवर कारवाई!

### जळगाव पोलिसांची विक्रमी धडक : ५१ लाखांचा दंड वसूल

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर रस्ते अपघातांना आळा बसावा आणि नागरिकांचा प्रवास सुरक्षित राहावा, या उद्देशाने जळगाव जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या ४८ तासांच्या विशेष मोहिमेत तब्बल ५१२ मद्यपी वाहन चालकांवर कठोर कारवाई करण्यात आली. जिल्हा पोलिसांच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी 'ड्रंक अँड ड्राईव्ह' मोहीम ठरली असून, या कारवाईतून एकूण ५१ लाख २० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी संपूर्ण जिल्ह्यात विशेष नाकाबंदी राबविण्यात आली होती. 'ड्रंक अँड ड्राईव्ह'विरोधात शून्य सहनशीलता धोरण स्वीकारत जिल्ह्यातील प्रमुख चौक, महामार्ग, शहरांतर्गत रस्ते तसेच ग्रामीण भागात 'ब्रेथ ॲनालायझर'च्या साहाय्याने वाहन चालकांची कसून तपासणी करण्यात आली. या मोहिमेत दि. ३० डिसेंबर रोजी १७१ तर दि. ३१ डिसेंबर रोजी तब्बल ३४१ चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. मोटार वाहन कायद्यानुसार मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यास किमान १० हजार रुपयांच्या दंडाची तरतूद असल्याने, या कारवाईतून एकूण ५१ लाख २० हजार रुपयांची दंड वसुली निश्चित झाली आहे.

**वाहतूक शाखांची कामगिरी**

या विशेष मोहिमेत जिल्हा वाहतूक शाखा तसेच स्थानिक पोलीस ठाण्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. जळगाव शहर वाहतूक शाखेने सर्वाधिक ५७ मद्यपी चालकांवर कारवाई केली. त्यापाठोपाठ भुसावळ वाहतूक शाखा (४५), चोपडा शहर पोलीस ठाणे (२८) आणि चाळीसगाव शहर वाहतूक शाखेने (२४) कारवाया केल्या. 'ड्रंक अँड ड्राईव्ह' व्यतिरिक्त अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवरही १४०० हून अधिक केसेस दाखल करण्यात आल्या असून, त्यातून ११ लाख ४२ हजार १८६ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

**अपघातमुक्त नववर्षाची रात्र**

जिल्हाभरात राबविण्यात आलेल्या कडक नाकाबंदी, सातत्यपूर्ण पेट्रोलिंग आणि पोलिसांच्या आक्रमक भूमिकेमुळे नववर्षाच्या रात्री एकही गंभीर अपघात घडला नाही. अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्यात पोलिसांना यश आले आहे, अशी माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवारांचे संकेत : ५० टक्के आरक्षण मर्यादेतील परिषदांचा पहिल्या टप्प्यात समावेश

## जिल्हा परिषदांच्या निवडणुकांना लवकरच मुहूर्त?

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई प्रतिनिधी

राज्यात महापालिकांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असतानाच आता जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे बिगुल कधीही वाजू शकते, असे संकेत मिळत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचक वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. ३२ जिल्हा परिषद आणि ३३१ पंचायत समित्यांच्या निवडणुकांना लवकरच मुहूर्त लागण्याची शक्यता आहे.

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका दोन टप्प्यांत होतील, असे संकेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. ५० टक्के आरक्षण मर्यादेच्या आत येणाऱ्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रथम घेण्यात येतील, तर ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असलेल्या जिल्ह्यांतील निवडणुका दुसऱ्या टप्प्यात होतील, असे त्यांनी स्पष्ट केले. ३२ जिल्हा परिषदांपैकी फक्त १२ जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांच्या आत आहे. या १२ जिल्हा परिषदांमध्ये लातूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग यांचा समावेश आहे.

### २० जिल्हा परिषदांनी आरक्षण मर्यादा ओलांडली

२० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५१ ते १०० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. या जिल्ह्यांमध्ये ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, हिंगोली, नांदेड, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, अहिल्यानगर, जालना व बीड यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांतील निवडणुका लगेच घेणे शक्य नसल्याने दुसऱ्या टप्प्यात घेण्याचा विचार सुरू आहे. आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या २० जिल्हा परिषदांसाठीच्या निवडणुकांचे भवितव्य न्यायालयीन निकालावर अवलंबून आहे. सर्वोच्च न्यायालयात याबाबतच्या याचिकांवर २१ जानेवारीला सुनावणी होणार आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटनात्मक रचनेत लवकरच बदल

### कार्यकारी समिती घेणार निर्णय : नववर्षात प्रतिनिधी सभा

लोकशाही न्यूज नेटवर्क
प्रयागराज वृत्तसंस्था

शताब्दी वर्ष साजरे करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या संघटनात्मक रचनेत बदल करण्याची तयारी केली आहे. २०२६ च्या प्रतिनिधी सभेत यावर चर्चा होऊन ते मंजूर होण्याची शक्यता आहे. गेल्या तीन वर्षांपासून याबाबत चर्चा सुरू असून कामाचा भाग तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी, आता विभाग प्रणाली सुरू केली जात आहे. कार्यकारी समिती ते अंमलात आणू शकते.

संघटनेच्या नवीन रचनेत, विभागीय प्रचारक आता प्रांतीय प्रचारकांसारखे काम करतील. संघाच्या योजनेतून निर्माण झालेला प्रांत आता केंद्र सरकारने ठरवलेले राज्य घेईल. २८ ते २९ राज्य प्रचारक असतील. यासोबतच, पदाधिकारीही असतील. त्यांचे काम संघाच्या सहयोगी संघटनांमध्ये समन्वय साधण्याचे असेल. विभागीय प्रचारकांचे कार्यक्षेत्र प्रांतीय प्रचारकांच्या तुलनेत लहान असेल. संघटनात्मक काम अधिक प्रभावी करण्यासाठी हे पाऊल उचलले जात आहे. नवीन रचनेत, दोन ते तीन प्रशासकीय विभाग (कमिशनरी) मिळून एक विभाग तयार होईल. उत्तर प्रदेशबद्दल बोलायचे झाले तर, येथे १८ विभाग आहेत, त्यानुसार नवीन व्यवस्थेत नऊ विभाग केले जातील. प्रत्येक विभागात एक विभाग प्रचारक असेल. संपूर्ण राज्यासाठी एकच राज्य प्रचारक असेल. सध्या राज्यात सहा प्रांतीय प्रचारक कार्यरत आहेत. सध्या दरवर्षी होणारी अखिल भारतीय प्रतिनिधी सभा दर तीन वर्षांनी आयोजित केली जाऊ शकते. या बदलाचा परिणाम प्रादेशिक प्रचारकांच्या संख्येवरही होईल. सध्या, पूर्व उत्तर प्रदेशसाठी एक प्रादेशिक प्रचारक आहे, तर पश्चिम उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडसाठी एक वेगळा प्रादेशिक प्रचारक सक्रिय आहे. जर प्रस्तावित बदल मंजूर झाला तर या दोघांच्या जागी फक्त एकच प्रादेशिक प्रचारक असेल, जो संपूर्ण उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडचे काम पाहेल.

### प्रादेशिक प्रचारकांची संख्या वाढणार!

प्रयागराजला भेट देण्यासाठी आलेल्या संघाच्या प्रचारक आणि हिंदू आध्यात्मिक आणि सेवा संस्थेने या संदर्भात अनौपचारिक भाषण दिले आणि सांगितले की या बदलानंतर दोन्ही राज्यांचे राज्य प्रचारक वेगळे असतील. त्याचप्रमाणे, राजस्थान आता उत्तर विभागात (ज्यामध्ये सध्या दिल्ली, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, हरियाणा आणि पंजाबचा समावेश आहे) जोडला जाईल. संपूर्ण झोनसाठी एक प्रादेशिक प्रचारक असेल. सध्या देशात ११ प्रादेशिक प्रचारक काम करत आहेत. नवीन रचनेत, प्रादेशिक प्रचारकांची संख्या नऊ पर्यंत कमी होईल. तर देशात सुमारे ७५ विभागीय प्रचारक असतील.


हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर - No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १७ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.